रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक २२६ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १३ जानेवारी २०२५

किंमत ४ ₹


## ९४ हजार वीज ग्राहकांना ‘अभय’

**रायगड :** महावितरणच्या अभय योजनेअंतर्गत कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित केलेल्या ९३ हजार ८४८ ग्राहकांनी १३० कोटींची रक्कम भरली आहे. या माध्यमातून संबंधित ग्राहक थकबाकीमुक्त झाले आहेत. थकबाकीदार वीज ग्राहकांचा मिळणारा प्रतिसाद बघता महावितरणने ३१ मार्चपर्यंत योजनेला मुदतवाढ दिली आहे. वीजबिलांच्या थकबाकीमुळे विद्युत पुरवठा कायमस्वरूपी स्थगित केलेल्या ग्राहकांसाठी महावितरणने गेल्या वर्षी १ सप्टेंबरपासून अभय योजना आणली होती. योजनेअंतर्गत ३१ मार्च २०२४ पर्यंत थकबाकीमुळे विद्युत पुरवठा खंडित केलेल्या घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांना थकबाकीमुक्त होण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्यानुसार राज्यातील ९३ हजार ८४८ वीज ग्राहकांनी आतापर्यंत योजनेचा लाभ पान २ वर

## अपघातात पादचाऱ्याचा मृत्यू

**नवीन पनवेल :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे लेनवर कि.मी ३ आदई गावाजवळ खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत चार चाकी वाहनाने धडक दिल्याने यात पादचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. त्याची ओळख पटलेली नाही. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत. यातील इनोव्हा कार (एमएच ४६ बीए ६६६४) वरील चालक जितेंद्र चिंभा शिंदे हे पुणे बाजूकडे जात असताना अचानक एक अज्ञात पादचारी इसम (वय अंदाजे ५०, नाव-गाव माहित नाही) पुणे लेनवरून मुंबई लेनकडे रस्ता पार करीत होता अचानक तो समोर आल्याने कार चालकाचा त्याच्या ताब्यातील वाहनावरील ताबा सुटला. त्यामुळे या अज्ञात पादचारी इसमाला जोरदार ठोकर दिली. पादचारी इसमाच्या पान २ वर

# ‘युवी स्पोर्ट्स’ ठरला अलिबाग ‘चॅम्पियन्स’




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना अलिबाग शहर पुरस्कृत व प्रशांत नाईक मित्रमंडळ अलिबाग यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या अलिबाग चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ टेनिस बॉल नाईट क्रिकेट स्पर्धे चे विजेतेपद युवी स्पोर्ट्स, अलिबाग संघाने पटकावले. प्रफुल्ल ॲण्ड निलेश स्पोर्ट्स साखर हा संघ उपविजेता ठरला.

अलिबाग येथील क्रीडाभवन मैदानावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत १६ संघ सहभागी झाले होते. अंतिम फेरीत युवी स्पोर्ट्स, अलिबाग संघाने प्रफुल्ल ॲण्ड निलेश स्पोर्ट्स साखर संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. प्रदीप स्पोर्ट्स साखर संघाने तृतीय तर एबी ग्रुप अलिबाग संघाचे चतुर्थ क्रमांक मिळवला. स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू म्हणून युवी स्पोर्ट्स, अलिबागचा निखील पाटील याला गौरविण्यात आले.

उत्कृष्ट गोलंदाज म्हणून प्रफुल्ल ॲण्ड निलेश स्पोर्ट्स साखर संघाचा अक्षय पाटील यांची निवड करण्यात आली. उत्कृष्ट फलंदाज म्हणून एबी ग्रुप अलिबागचा ओमकार पाटील याची निवड करण्यात आली.

अलिबाग नागरीचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस ॲड.प्रवीण ठाकूर, युवराज पाटील, महेश शिंदे, अशोक प्रधान, महेश पाटील, कपिल अनुभवणे यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. स्पर्धेतील अंतिम विजेत्या संघाला दोन लाख रुपये, चषक व टीव्ही, उपविजेत्या संघास एक लाख रुपये, चषक व टीव्ही बक्षीस देण्यात आले. तृतीय व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी ५० हजार रुपये चषक व टीव्ही बक्षीस देण्यात आले. उत्कृष्ट खेळाडूस दुचाकी, उत्कृष्ट गोलंदाज व फलंदाज यांना सायकल अशी वैयक्तिक बक्षीसे देण्यात आली.

### एका षटकात सहा षटकार

**एमडी वॉरियर्स थळ विरुद्ध त्रिशाव्या इल्हेवन वरसोली या सामन्यात एमडी वॉरियर्स थळ संघाचा फलंदाज अक्षय पाटील याने एकाच षटकात सहा षटकार मारण्याचा विक्रम केला.**

(सर्व छायाचित्र पान ८ वर)

## वेधक

### सानपाडा गोळीबार प्रकरणी एक अटक

**नवी मुंबई :** सानपाडा येथे एपीएमसीतील कंत्राटदार राजाराम टोके यांच्यावर बेछूट गोळीबार प्रकरणातील व्यक्तीला पुण्यातून अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. एपीएमसीतील कचरा उचलण्याच्या कंत्राट वादातून हा गोळीबार करण्यात आला होता. आशियातील सर्वात मोठी असणारी कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील भाजीपाला बाजारातून कचरा उचलण्याच्या कंत्राट वरून अनेक गटात वाद आहेत. सानपाडा स्टेशन जवळ डी मार्ट चौकात ३ जानेवारीला सकाळी सव्वा नऊच्या सुमारास याच कंत्राट वादातून राजाराम टोले यांच्यावर पान २ वर

### ‘एक्का मरीन ग्लोबल कल्चर’ची फसवणूक

**पनवेल :** मुंबई आणि नवी मुंबईतील नागरिकांना मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून एक्का मरीन ग्लोबल कल्चर कंपनीने फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणात मोहम्मद इस्माईल शेख यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. कंपनीने महिन्याला १५ टक्के परताव्याचे आश्वासन देत शेख यांच्याकडून १४ लाख रुपयांची गुंतवणूक घेतली होती. सुरुवातीचे काही महिने परतावा दिल्यानंतर कंपनीने तो थांबवला. तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास अंधेरी एमआयडीसी पोलिसांकडे वर्ग केला. मुंबई आणि नवी मुंबई पोलिसांनी विनय कांबळे यांना ताब्यात घेतले आहे.

## अमली पदार्थांच्या सेवनातून

# मित्राने केला मित्राचा खून

**। पेण । प्रतिनिधी ।**

**पेण शहरातील फणसडोंगरी येथील रहिवासी बाळु सीताराम चुनारे यांचा मुलगा गणेश बाळु चुनारे (वय-१४) याची अज्ञात इसमाने हत्या केल्याची घटना शनिवारी (दि.११) घडली. याबाबतची फिर्याद पेण पोलीस ठाण्यात दाखल होताच पेण पोलिसांनी तपासाची सूत्रे हलवित अवघ्या चार तासात गणेशची हत्या करणाऱ्या अनिरूद्ध कदम (वय १५) याला अटक करून त्याची रवानगी कर्जत येथील बाल सुधारगृहात केली आहे.**



पेण फणसडोंगरी परिसरात अनेक वेळा पोलिसांकडून गांजा, चरस विकणाऱ्यांविरूध्द कारवाई झालेली आहे. मात्र आजही या परिसरात अमली पदार्थ विकले जात आहेत. त्यामुळेच फणस डोंगरी व पिरडोंगरी परिसरात अनेक अल्पवयीन मुले व्यसनाधिन झालेली पाहायला मिळत आहेत. गांजा, चरस, एमडी या पदार्थांबरोबर आता अल्पवयीन मुले नेलपेंट, रिम्युव्हर, आयोडेक्स, पंचरचे सोल्यूशन, पेंट, ग्लू, ड्रायक्लिनिंगचे केमिकल, बॉण्ड, स्टिकफास्ट, फेविक्विक, गॅसोलिन, हेअरस्प्रे, डिओड्रंट, थिनर, पर्मनंट मार्कर आदी पदार्थांमध्ये अल्पवयीन मुले अडकल्याचे चित्र दिसत असून एक प्रकारे येणारी पिढी पालकांच्या बेजबाबदारपणामुळे वाया जाण्याच्या मार्गावर आहे.

याचेच जिवंत उदाहरण म्हणजे पेण कासार तळा साई मंदिर शेजारी झालेली गणेश बाळु चुनारे याची हत्या.याविषयी सविस्तर वृत्त असे की, गणेश चुनारे हा मुलगा आपल्या मित्रांसोबत बाहेर गेला होता. परंतू रात्री तो परत आला नाही. मात्र ११ जानेवारी २०२५ रोजी सकाळी त्याचा मृतदेह आंबेडकर शाळेजवळील झुडपात आढळला. परंतू, हत्या की आकस्मित मृत्यू याबाबत पोलीस चौकशी करीत होते. बाळु चुनारे यांच्या फिर्यादीनुसार पेण पोलीस ठाण्यात अज्ञात इसामाविरुध्द गुन्हा नोंद केला. उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या देखरेखीखाली पेण पोलीस ठाणे अधिक तपास सुरू केला. महत्वाची बाब म्हणजे गणेश चुनारे याच्या मृत्यूने पुन्हा एकदा साई मंदीर परिसर पान २ वर

### पोलीस यंत्रणेचे हात अपुरे

**पेण शहर ज्या प्रकारे झपाट्याने वाढत आहे, त्या प्रकारे अनैतिक व अवैध धंद्यांनादेखील उधाण आलेले पहायला मिळत आहे. त्यातच पोलीस खात्याजवळ असलेल्या कमी मनुष्यबळामुळे अवैध धंदे रोखण्यास पोलीस यंत्रणेचे हात अपुरे पडत आहेत. फणसडोंगरी परिसरात स्थलांतरीत झालेल्या लोकांचे मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. परप्रांतियांचा लोंढादेखील वाढल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळेच अमली पदार्थदेखील डोंगरी परिसरात सहज उपलब्ध होत आहेत.**

# सरपंचाच्या मृत्यूमुळे बीड पुन्हा हादरलं

### राखेची वाहतूक करणाऱ्या वाहनानं चिरडलं

**। बीड । वृत्तसंस्था ।**

बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर जिल्ह्यासह राज्याचे राजकारण ढवळून निघाले असताना आता पुन्हा एकदा बीडमधील परळी तालुक्यातील आणखी एका सरपंचाचा अपघाती मृत्यू झाला आहे. परळीतील औष्णिक विद्युत प्रकल्पातून निघणाऱ्या राखेची अवैध वाहतूक आणि व्यवसाय होत असल्याचा आरोप भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी केला होता. याच राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परनं सौंदना गावचे विद्यमान सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेत क्षीरसागर यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.



या अपघाताची माहिती मिळताच परळी ग्रामीण पोलीस घटनास्थळी दाखल झाले. संबंधित टिप्पर चालकाला अटक करण्यात आली आहे. परळी तालुक्यातील मिरवट फाट्यावर सदर अपघात झाला. ही धडक इतकी भीषण होती की, क्षीरसागर यांच्या दुचाकीचा चुराडा झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, सौंदना गावचे सरपंच अभिमन्यू क्षीरसागर हे परळीच्या दिशेने जात होते. यावेळी शनिवारी (दि. ११ जानेवारी) रात्री पान २ वर

## ॲम्ब्युलन्सचा भीषण अपघात; तीन गंभीर जखमी



**। वावोशी । वार्ताहर ।**

मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर मृतदेह घेऊन जात असलेल्या बोलेरो टेम्पो ॲम्ब्युलन्सचा मागील टायर फुटल्याने गंभीर अपघात झाला. या दुर्घटनेत तीन जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

चालक अशोक पटेल (वय २६, रा. भिवंडी, ठाणे) हा भरत बाबुराव पांचाळ यांचा मृतदेह आणि नातेवाईकांना घेऊन सोलापूरच्या वळसंग येथे जात असताना खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारद गावाजवळ ॲम्ब्युलन्सचा मागील टायर अचानक फुटल्याने ती पलटी झाली.

या अपघातात वैजनाथ निवृत्ती पांचाळ (वय ६०), रंजना वैजनाथ पांचाळ (वय ५०), आणि अंतरा भरत पांचाळ (वय ११, सर्व रा. भिवंडी, ठाणे) गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तात्काळ एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच खालापूर पोलीस, बोरघाट महामार्ग पोलीस, आणि पळस्पे स्टाफ यांनी घटनास्थळी धाव पान २ वर

# बापाने केला मुलाचा खून

**■ सांगोलातील हातीद येथील घटना; कुटुंब माणगाव निजामपूरमधील**

**। सांगोला । प्रतिनिधी ।**

मुलगा आईस हाताने मारहाण करून शिवीगाळी करत असताना, भांडण सोडवण्यास गेलेल्या बापास मुलाने ढकलुन दिले. त्यामुळे चिडलेल्या बापाने जवळच पडलेली कुऱ्हाड उचलुन मुलाच्या डोक्यात दोन वेळा घाव घालून खून केला. ही घटना सांगोलातील हातीद येथे शुक्रवार (दि. १०) जानेवारी रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली.

याप्रकरणी बिरा बंडगर रा. शिंपीवस्ती शाळेच्या पाठीमागे हातीद ता. सांगोला, जि. सोलापूर यांनी फिर्याद दिली असून रोहिदास रामा पवार (वय १८) रा. कुसुबळे आदिवासी वाडी, निजामपुर ता. माणगांव जि. रायगड असे खून झालेल्याचे नाव आहे. तर वडील रामा किसन पवार यांच्याविरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांची हातीद येथे सामाईक जमीन असून ती पडीक असल्याकारणाने त्यावरचिलारीची लहान -मोठी झाडे वाढली आहेत. ती स्वच्छ करण्यासाठी एक महिन्यापूर्वी रामा पवार व त्याची पत्नी गौरी व मुलगा रोहिदास असे तिघेजण त्यांची कुटुंब राहण्यास होते. फिर्यादी यांच्या पडीक शेतात राहून तेथील काटेरी चिलार तोडून त्याचा कोळसा करत होते.

दिनांक १० जानेवारी रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास फिर्यादी घराबाहेर जनावरांना चारा पाणी करीत असताना, शेतात कोप मारून राहत असले रोहिदास याचे व आई गौरी यांच्याशी कोणत्यातरी कारणाने भांडण सुरू असल्याचा आवाज आला.

त्यावेळी फिर्यादी व घरातील लोक यांनी सदर ठिकाणी जाऊन पाहिले असता, पान २ वर

## ब्लास्टिंगमुळे माणकीवली ग्रामपंचायत कार्यालयाला तडे

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

माणकीवली ग्रामपंचायत हद्दीत अनेक खडी कॅशर असून या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या खडी तयार करण्यासाठी डोंगराळ गावाजवळील जमिनीला सुरुंग लावण्याचे प्रकार घडतात. अनेकदा गावाच्या लगत असणाऱ्या सी.बी.सिंग खडी कॅशरमधील ब्लास्टिंगमुळे माणकीवली ग्रामपंचायत कार्यालयाला तडे गेल्याने नागरिक संतप्त भावना व्यक्त करत आहे.



या संदर्भात ग्रामपंचायतीने वेळोवेळी निवेदन दिले असता खडी क्रशर मालक या निवेदनाला केराची टोपली दाखवत आहे.

माणकीवली ग्रामपंचायत नवीन २५ लाख रुपये खर्च करुन कार्यालय बांधण्यात आले. परंतु काही महिन्यातच या कार्यालयाला ब्लास्टिंगमुळे तडे गेल्याने ग्रामपंचायतीने मालकाला या संदर्भात निवेदन देत आपल्या खडी क्रशरमधील ब्लास्टिंगमुळे कार्यालयाला तडे गेल्याची कल्पना देत निवेदन दिले असता खडीमशीन मालक याकडे कानाडोळा करत करीत आहे.

> **“अंजरुन गावाच्या हद्दीत असणाऱ्या सी.बी.सिंग खडीमशीनमुळे ग्रामपंचायत कार्यालयातील सर्वच भिंतींना मोठमोठे तडे गेले असून या तड्यामुळे नव्या इमारतीच्या सौंदर्याला गालबोट या खडी क्रशरमालकाच्या मनमानी कारभारामुळे लागत आहे, त्यामुळे महसूल विभागाने या खडी क्रशर मालकावर कडक कारवाई करावी.**
> **– बाळकृष्ण वाघमारे, सरपंच”**

> **“सी.बी.सिंग या खडी क्रशरमधील ब्लास्टिंगमुळे ग्रामपंचायत कार्यालयाला तडे गेल्याने या संदर्भात या खडी क्रशर मालकाला दोन वेळा निवेदन दिले असता याकडे त्याने कानाडोळा केला असून या मालकाने याचे गांभीर्य न घेतल्यास पुढील काळात ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीला मोठा धोका उद्भवू शकतो. – सखुबाई कडाले, ग्रामसेविका”**




# माणगावात अनाधिकृत बांधकामे जमीनदोस्त

## • मोरबा रोड ते बामणोली रोड न.पं. ची धडक कारवाई; बाह्यवळण मार्ग झाला मोकळा





**| माणगाव | वार्ताहर |**

**माणगाव शहरातील दिवसेंदिवस वाहतुकीची कोंडी वाढतच चालली आहे. यावर उपाय म्हणून मोरबा रोड व्हाया कालव्या मार्गे ते बामणोली मार्ग आणि बामणोली मार्ग ते मुंबई गोवा महामार्ग या मार्गाचे रुंदीकरण करण्यासाठी या बाह्यवळण मार्गावरील बेकायदेशीर आणि अनाधिकृत बांधकामे जमीनदोस्त करुन माणगाव नगर पंचायतीने ही धडक कारवाई शनिवारी (दि.११) सायंकाळी करण्यात आली. त्यामुळे या मार्गाचे दुपदरीकरण होऊन हा मार्ग रहदारीला मोकळा होणार आहे.**

माणगाव शहरात सध्या वाहतूक कोंडीने नागरिक हैराण आणि हतबल झाले आहेत. मुंबई गोवा महामार्ग आणि कळमजे जोड रस्त्या जवळील बायपास महामार्गाचे काम विविध कारणांमुळे बंद अवस्थेत आहे. शहरातील काळ आणि गोद नदीवरील पूलांची कामे संथगतीने सुरू आहेत. त्यामुळे सातत्याने माणगाव शहरातील वाहतुकीची कोंडी वाढतच चालली आहे. यासाठी पर्यायी मार्ग म्हणून मोरबा रोड ते बामणोली रोड या मार्गावर अनाधिकृत बांधकामांचे अडथळे निर्माण होत होते.

ती बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली आहेत. हा मार्ग आता लवकरच पूर्ण होईल. त्यामुळे माणगाव शहरातील वाहतुकीची कोंडीतून मोठ्या प्रमाणात सुटका होईल असा विश्वास नगरपंचायतीने केला आहे.

नुकतीच माणगाव येथील तहसील कार्यालयात शहरातील वाहतुकीच्या कोंडीतून सुटका करावी अशी मागणी करण्यात आली होती. त्या दृष्टीने नगरपंचायत मार्फत तातडीने कार्यवाही करुन हा मार्ग नव्याने दुपदरीकरण करण्यासाठी मोकळा झाला असून या मार्गाचे थांबलेले काम सुरू झाले आहे. हा मार्ग पूर्ण होण्यासाठी दोन कोटी रुपये अपेक्षित खर्च असून ६० लाख रुपये मंजूर झाले आहेत. उर्वरित १ कोटी ४० लाख रुपये शासनाच्या विविध योजनेतून मंजूर करून देणार आहेत.

या पर्यायी मार्गामुळे मुंबई येथून श्रीवर्धन, हरी हरेश्वर, म्हसळा येथे जाण्यासाठी आणि श्रीवर्धन म्हसळा येथून मुंबई, पुणे येथे जाण्यासाठी माणगाव शहरातून न जाता हा मार्ग सोयीस्कर ठरणार आहे.

माणगाव शहरातील जुन्या महामार्गाचे चौपदरीकरण अद्यापही झालेले नाही. काळ आणि गोद नदीवरील पूल बांधण्यात आलेला नाही. त्यामुळे गेल्या पाच वर्षांपासून शहरात ठिकठिकाणी नेहमीच वाहतूकीची कोंडी होत असते. तसेच खरवली जोड रस्ता ते सुरव, मोरबा गाव येथूनही वाहतूक सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीतून प्रवाशांची सुटका होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

हि बेकायदेशीर बांधकामे जमीनदोस्त केल्याने नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत. अशाच प्रकारे मुंबई गोवा महामार्गावरील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी शहराच्या बाजारपेठेतील महामार्गाच्या दुतर्फा असणाऱ्या बेकायदेशीर आणि अनाधिकृत बांधकामे तातडीने जमीनदोस्त करावी अशी मागणी महामार्ग कार्यालयाकडे करण्यात आली आहे. मात्र महामार्ग कार्यालय केवळ व्यावसायिकांना नोटीस बजावण्यात समाधान मानत आहे. याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने आदेश देऊन सुद्धा शहरातील बाजारपेठेच्या बेकायदेशीर बांधकामे, दुकाने, टपरीधारक यांच्यावर कोणत्याही प्रकारचा कारवाईचा बडगा उगारला नसून त्यांना अभय दिले आहे. त्यामुळे वाहतूकीच्या कोंडीत आणखी भर पडली आहे.

# सहकार क्षेत्रात अनेक अडचणी, तरी पतसंस्था भक्कम

### डॉ. उदय जोशी यांचे प्रतिपादन



**| रोहा | वार्ताहर |**

सहकार क्षेत्रात अनेक अडचणी आहेत पण आपल्याला घाबरण्याचे कारण नाहीत पतसंस्थेचा नावच श्री स्वामी समर्थ आहे आणि श्री स्वामी समर्थ म्हणतात भिऊ नको मी तुझ्या पाठिशी आहे म्हणून आपली पतसंस्था भक्कम आहे असे प्रतिपादन या कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी यांनी केले.

ते रोहा शहरातील सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या श्री स्वामी समर्थ नागरी सहकारी पत संस्था मर्यादित रोहाच्या रौप्य महोत्सव सोहळ्या प्रसंगी ते बोलत होत. यावेळी व्यासपीठावर रोहा सहायक निबंधक राखी गावडे, रायगड जिल्हा पतसंस्था महासंघाचे चेअरमन ॲड. जे टी. पाटील श्री स्वामी समर्थ पतसंस्थेचे अध्यक्ष संदिप जठारी, उपाध्यक्ष लक्ष्मण चांदगांवकर, संचालिका उषा चांदगांवकर, सीमा ठाकरे, संचालक चंद्रकांत जाधव, सुरेश मोरे, गणेश सदावर्ते, अर्जुन गोरीवले, गंगाराम कोकळे, सखाराम कराळे, गजानन गायकर, रामदास सुरळकर, व्यवस्थापक महेंद्र शेडगे उपस्थित होते.

आपली पतसंस्था या वर्षी रौप्य महोत्सव साजरा करीत आहे. आपल्या पतसंस्थेत सुरूवातीला २५५ सभासद होते. आणि आज ५००० सभासद आहेत. सहकार चालविणे अडचणीचे असूनदेखील आपली पतसंस्था प्रगतीपथावर आहे. हि नक्कीच कौतुकास्पद बाब आहे, असे रोह्याच्या सहायक निबंधक राखी गावडे यांनी स्पष्ट केले.

# 'नारबा लिवतोय' कथासंग्रहाचे प्रकाशन

## थायलंडच्या वैचारिक चळवळीचा होणार उलगडा




**| चिरनेर | वार्ताहर |**

ज्येष्ठ कथाकार मोहन वाघमारे यांचा वैचारीक कथासंग्रह नारबा लिवतोय या पुस्तकाचे प्रकाशन जेष्ठ साहित्यिक प्रा. ऋषिकेश कांबळे यांच्या हस्ते बँकॉक, थायलंड येथे संपन्न झाले.

नारबा लिवतोय या पुस्तकाचे लेखक ज्येष्ठ पत्रकार मोहन वाघमारे यांनी समाजातील अंधश्रद्धा असंस्कृतपणा अशिक्षितपणा समाजातील, या समता ममता मानवाता या गोष्टीस बाधक ठरणाऱ्या विचारांचा समाचार आपल्या लेखणीतून घेतला आहे. सभोवताली देशविदेशातील घडणाऱ्या अनिष्ट प्रकारांना मूर्तरूपाने ग्रामीण शहरी बोलीचा लहेजा आवश्यकतेनुसार वापरून आपल्या लेखणीतून दाखवून दिले आहे. प्रत्येक कथा ही समाजातील दुखरी नस शोधत, तिच्यावर योग्य असा शाहू फुले आंबेडकर व बौद्ध विचारांचा औषधोउपचार करत समोर येते. त्यातून समाजाला योग्य असा भरभक्कम सामाजिक संदेश देऊन जाते. 'नारबा लिवतोय' या शीर्षक कथेतील नायक नारबा हा सातारा जिल्ह्यातील देहबोली घेऊन वाचकांच्या समोर येतो. त्याच्या साध्याभोळ्या मराठमोळ्या वागण्यातून विनोद निर्मिती करतांना तो एक वैचारिक सत्य समाजा समोर अधोरेखित करतो. अंधश्रद्धेचा बळी, श्रद्धेचा बाजार, जागरण, या कथा अंधश्रद्धेवर प्रहार करतात. लखुआप्पाचा सावकऱ्या ही सत्यकथा प्राणी व मानव यांच्यातील सलोख्याचे सबंध दृढ करते. शर्यत ही कथा वैमनस्यातून मैत्रीचे सबंध प्रस्थापित करते. तसेच हॉटेल जपान ही कथा वैज्ञानिक सत्यधर्माचे पालन करण्याचा संदेश देऊन जाते. नारबा लिवतोय या कथासंग्रहात एकूण सोळा कथांचा समावेश आहे. तसेच प्रत्येक कथा सुरवातीपासून वाचकाला खिळवून ठेवते. कथा संपूर्ण वाचून झाल्याशिवाय वाचक पुस्तक खाली ठेवत नाही. हेच या कथासंग्रहाचे यश आहे.नारबा लिवतोय या पुस्तकाचे प्रकाशन शाहुफुले आंबेडकरी साहित्यसंमेलन बँकॉक थायलंड येथे प्रा. ऋषिकेश काबळे याच्या हस्ते झाले, याप्रसंगी महाराष्ट्रातील जेष्ठ साहित्यिकांची उपस्थिती उल्लेखनीय ठरली. एम टीएनएल या दुरसंचार कंपनीतून निवृत्त झालेल्या लेखकांनी वयाच्या सत्तरीत पुस्तक प्रकाशन करणे म्हणजे साहित्य संस्कृतीत मैलाचा दगड आहे. ज्येष्ठ लेखक मोहन सीताबाई आकाराम वाघमारे यांचे समाजातील अनेक स्तरातून स्वागत होत आहे. 'नारबा लिवतोय' या कथासंग्रहाचे स्वागत तसेच अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# डॉ.सी.डी.देशमुख यांच्या जयंती निमित्ताने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**| खांब | वार्ताहर |**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद मातृ संस्था असलेल्या रायगड जिल्हा प्रेस क्लब संलग्न रोहा प्रेस क्लबच्यावतीने रोह्याचे सुपुत्र स्व. डॉ.सी.डी. तथा चिंतामणराव देशमुख यांच्या जयंती सोहळ्याचे औचित्य साधत भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवारी १४ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता श्रीराम मारूती चौक, रोहा येथे स्पर्धा पार पडणार आहे. सामाजिक बांधिलकी जपणारी तसेच शैक्षणिक कला, क्रीडा, सांस्कृती वारसा जोपासणारी क्रियाशील पत्रकार संघटना असलेल्या रोहा प्रेस क्लबच्या माध्यमातून सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान, अभिनव रोहा, शिवचरण मित्र मंडळ, राजमुद्रा फाऊंडेशन, स्पंदन नाट्यसंस्था, मावळा प्रतिष्ठान, रोटरी क्लब ऑफ रोहा व श्री कृपा फाऊंडेशन, रोहा युवा यांच्यावतीने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी लहान गट विषय १.नैसर्गिक शेती आज काळाची गरज,२.माँ साहेब जिजाऊ चरित्रातून काय शिकावे? ३.वणवा, ज्वलंत विचारांची दाहकता, कारणीभूत कोण?,४. क्रिक्रेट खेळ की फॅशन,५.सोशल मिडिया अतिवापर कितपत योग्य तर खुला गट विषय-१.लग्नासाठी मुलीचं नाहीत-वास्तवता आणि कारण,२.निवडणुकीत पैशाचा घोडेबाजार लोकशाहीला तारक की मारक, ३.बदलते शैक्षणिक धोरण शाप की वरदान,४. वाहतूक नियमांची पायमल्ली, अपघाताला निमंत्रण,५.भलतीच स्टंटबाजी मृत्यूला आमंत्रण आदी विषय देण्यात आले आहेत. स्पर्धेची नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी सुहास खरिवले ९६६५१६९६६६, रोशन चाफेकर ८८८८०५६०९३, नंदकुमार मरवडे ८३०८६८८२२९ व रविंद्र कान्हेकर ९९७५५०८५९२ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मुरुड शहरात श्रीराम भक्तांचा जल्लोष



**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

अयोध्येतील भव्य श्रीराम मंदिराचे उद्‌घाटन आणि रामलला स्वरूपातील मृर्तीची प्राणप्रतिष्ठा या प्रथम वर्धापनदिन तथा वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त मुरुड शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते या अत्युच्च आनंदाचा सोहळ्या करिता हजारो श्रीराम भक्त एकत्र येऊन श्रीरामाचा जल्लोष करण्यात आला

काल सायंकाळी शहरातील सर्व पाखडयातील श्रीराम भक्त मारुती नाका परिसरातील हनुमान मंदीरा जवळ एकत्रित येऊन मंदिरात महाआरती करुन शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली ते चिखलपाखाडी नाका, बाजारपेठ, श्रीकाळभैरव मंदिर व भंडारा वाडा या ठिकाणा वरुन सर्वात मोठी भव्य शोभायात्रा मिरवणूक काढली यावेळी नागरिकांनी स्वागता करिता रस्त्यावर सुंदर रांगोळ्या, घरावर व रस्तावर भगवे झेंडे लावण्यात आले होते. यामुळे शहरात जणू काही भगवे वादळ पाहायला मिळत होते. यावेळी शोभायात्रेत श्रीराम भक्तांनी हातात झेंडे व डोक्यावर भगव्या रंगाची टोपी, भगवे कपडे सर्वानी परिधान केले होते. डीजेच्या गाण्यांवर महिला व लहान मुले मुली वृद्ध ठेका पकडुन नाचत होते आणि श्री रामाचा जयजयकार करत होते.

भव्य शोभायात्रेत श्रीराम, सीतामाई आणि लक्ष्मण एक विशिष्ट पेहराव करून एका रथात विराजमान झाले होते. श्रीरामाची भूमिका भरत जैन, सितामाई भक्ती पानवलकर, लक्ष्मण- साईराज जैन, तर हनुमान - विकास कौलकर यांनी बजावली तर छोट्या श्रीराम- राघव करंबे, सितामाई- सारा करंबे, हनुमान -जैन यांनी केली. शहरातील विविध ठिकाणी ही मिरवणूक फिरवण्यात आली.

# पाचाड येथे जन्मोत्सव सोहळा

**रायगड :** रायगड जिल्हा परिषद आणि पाचाड ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या ४२६ व्या जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन पाचाड येथील समाधीस्थळी करण्यात आले होते. यावेळी रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विधिवत पूजन,अभिषेक व महाआरती करण्यात आली. या प्रसंगी गटविकास अधिकारी डॉ. स्मिता पाटील, सरपंच सीमा बेंदुगडआदी ग्रामस्थ उपस्थित होते.

पान १ वरून

## अपघातात पादचाऱ्याचा मृत्यू

डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याला रस्त्याचे बाजूला घेऊन आयआरबी ॲम्बुलन्सच्या डॉक्टरांनी त्याला तपासून जागेवरच मृत घोषित केले. पादचारी इसमास खाजगी रुग्णवाहिकेने उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत.

## सरपंचाच्या मृत्यूमुळे बीड पुन्हा हादरलं

साडे आठच्या सुमारास मिरवट फाट्यावर त्यांच्या दुचाकीला राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परने धडक दिली. या धडकेत क्षीरसागर गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला. या घटनेवर भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी प्रतिक्रिया दिली असून हा अपघात की घातपात? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. ते म्हणाले, सरपंच क्षीरसागर यांचा जागेवरच मृत्यू झाला. हा घातपात होता का? याची चौकशी झाली पाहीजे. संतोष देशमुख प्रकरण झाल्यानंतरही अवैध राखेची वाहतूक करणारे टिप्पर बंद झालेले नाहीत. याला परळी पोलीस, औष्णिक विद्युत प्रकल्पाचे अधिकारी जबाबदार आहेत. बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांचीही निर्घृण हत्या झाली. गुन्हेगारांचे जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वाशी असलेल्या लागेबांध्यांमुळेच बीड जिल्ह्यात गुन्हेगारी फोफावली असेही सांगितले जात आहे.

## ॲम्ब्युलन्सचा भीषण अपघात; तीन गंभीर जखमी

घेतली. जखमींना तात्काळ रुग्णवाहिकेतून रुग्णालयात हलवले गेले. मृतदेह आणि नातेवाईकांना दुसऱ्या खाजगी ॲम्ब्युलन्सने गंतव्य स्थळी पाठवण्यात आले. अपघातग्रस्त वाहन क्रेनच्या सहाय्याने बाजूला काढून वाहतूक सुरळीत करण्यात आली. या घटनेमुळे महामार्गावरील वाहतुकीच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. वाहनांची नियमित तपासणी आणि सुरक्षित वाहतुकीसाठी अधिक काळजी घेण्याची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## बापाने केला मुलाचा खून

मुलगा रोहीदास हा, त्याच्या आईस हाताने मारहाण करून शिवीगाळी करत होता. त्याचे वडील रामा पवार हे सोडविण्यासाठी गेले असता, मुलगा रोहिदास याने वडीलास ढकलुन दिले, त्यानंतर मात्र रामा पवार यांनी जवळच पडलेली कुऱ्हाड उचलुन रागाने मुलगा रोहिदास यास, तुला आज सोडत नाही, असे म्हणून रोहिदास याच्या डोकीत दोन वेळा कुऱ्हाडीचे घाव घातल्याने तो पडला.

यावेळी फिर्यादी व इतर लोकांनी रामा पवार यास पकडून ठेवले, त्यानंतर पोलीस ठाणेस फोन वरून कळविले. पोलीस सदर ठिकाणी आल्यानंतर जखमी रोहिदास पवार यास ग्रामीण रूग्णालय, सांगोला येथे आणले, तेव्हा वैद्यकीय अधिकारी यांनी त्यास तपासून तो उपचारापूर्वी मयत झाल्याचे सांगितले, असे पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## ९४ हजार वीज ग्राहकांना 'अभय'

घेतना १३० कोटी रुपयांचा भरणा केला आहे. या ग्राहकांचे ५७ कोटी ३६ लाख रुपयांचे व्याज व २ कोटी १२ लाख रुपयांचा विलंब आकार माफ केले आहेत. राज्यभरात अभय योजनेला मिळणारा प्रतिसाद बघता महावितरणने मार्च एन्डींगपर्यंत योजनेला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

योजनेत सहभागी होणाऱ्या थकबाकीदार ग्राहकांना मूळ बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून उर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यांत भरण्याची सवलत दिली आहे. जे घरगुती, व्यावसायिक व इतर लघुदाब ग्राहक एकरकमी थकीत बिल भरतील त्यांना दहा टक्के तर उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत मिळणार आहे. विहित मुदतीतही थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांवर कायदेशीर कारवाईचा इशारा महावितरणने दिला आहे. ग्राहकांनी सवलतीचा लाभ घेत चिंतामुक्त व्हावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

असे व्हा थकबाकी मुक्तअभय योजनेत सहभागी होण्यासाठी ग्राहकांना www.mahadiscom.in/wss/wss या वेबसाइटवरून ऑनलाइन पद्धतीने लाभ घेता येईल. याशिवाय महावितरणच्या मोबाईल ॲप किंवा वीजग्राहक १९१२ किंवा १८००२३३३४३५ किंवा १८००२१२३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून माहिती घेता येईल. योजनेनुसार पैसे भरल्यानंतर संबंधित ग्राहकांना योग्य पुरावे सादर करून पुन्हा एकदा त्याच पत्त्यावर नियमित वीज कनेक्शन घेता येणार आहे.

## मित्राने केला मित्राचा खून

चर्चेच्या गर्दीत सापडलेला आहे. सदरील गणेश याचा मृत्यू अकस्मित झाला आहे की, हत्या याबाबत उलट सुलट चर्चा पेण शहरात सुरु होती. पोलिसांच्या तपासात गणेशने आत्महत्या केली नसून त्याची व्यसनाधिनतेतून हत्या करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी बांधला आणि त्या दिशेने तपासाची सूत्रे फिरवली. पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संदीप बागूल यांनी तातडीने घटनास्थळी पोहचून तपास यंत्रण सज्ज केली. फॉरेंसिक व्हॅन व श्वान पथकास पाचारण करून प्राथमिक तपास करण्यात आला. घटनास्थळावरील परिस्थिती जन्य पुराव्याचे आधारे व गणेशच्या संगतीत असणारे मित्र यांचा शोध घेउन सीसीटीव्हीच्या आधारे आरोपीचा शोध घेउन त्यास ताब्यात घेतले आहे. अनिरूद्धला ताब्यात घेतल्यानंतर त्याने गणेशची ात्या केल्याचे कबुल केले. बॉण्ड (सोल्यूशन) या व्यसनाच्या आहारी जाऊन अनिरूध्द कदम याने गणेश चुणारे याच्यावर लाकडी राप्टरच्या सहाय्याने वार करून अनिरूध्द कदम फरार झाला होता. असे त्याने आपल्या कबुलीत म्हटले असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

कार्यान्वित केलेल्या विशेष पथकामध्ये शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे फुटेज संकलन, फुटेज चेक, नाकेबंदी, आरोपीचे शोध, पंचनामा व पुरावे हस्तगत याप्रमाणे सपोनि निलेश राजपूत, मसपोनि अस्मिता पाटील, पोउपनि समद बेग, पोउपनि प्रतीक पोकळे, पोउपनि विक्रम नवरखेडे, सफौ भाग्यवान कांबळे, सफौ राजेश पाटील, पोहवा प्रकाश कोकरे, राजेंद्र भोनकर, संतोष जाधव, सागर खांडसकर, अजिंक्य म्हात्रे, सचिन व्हस्कोटी, सुशांत भोईर, पोना अमोल म्हात्रे, पोकॉ गोविंद तलवारे, संदिप शिंगाडे, अशांत सांगविकर आदींच्या समन्वयातून अवघ्या चार तासात आरोपीला गजाआड केले आहे.

## सानपाडा गोळीबार प्रकरणी एक अटक

आठ गोळ्या झाडल्या होत्या. त्यातील तीन गोळ्या टोके यांना लागल्या मात्र सुदैवाने राजाराम टोके याच्या वर्मी गोळ्या न लागल्याने जीवावर बेतले नाही. गोळी झाडणारे दुचाकीवरून आले होते. गोळीबार करून दोघेही फरार झाले होते. याच प्रकरणातील दुचाकी चालक संतोष गवळी (वय ३८ राहणार कोपरी) याला पुण्यातून अटक करण्यात आली आहे. शनिवारी त्याला न्यायालयात हजर केले असता १४ तारखे पर्यंत पोलीस कोठडी फर्माविण्यात आली आहे.




# चरई बुद्रुक येथे ग्रंथ दिंडीचे आयोजन

**| तळा | वार्ताहर |**

जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा च्या वतीने ''वाचन संकल्प महाराष्ट्राचा'' या शासनाच्या उपक्रमाअंतर्गत वाचन पंधरवाडा साजरा करण्यात येत आहे. याद्वारे महाविद्यालयांच्या वतीने चरई बुद्रुक येथे ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर ग्रंथ दिंडीचे पूजन स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य रायगडभूषण पुरुषोत्तम मुळे तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. शाहिना मिर्झा यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी गाव कमिटीचे अध्यक्ष सुचित पतारे, माजी सरपंच दिलीप पांचाळ, उपाध्यक्ष सचिन पतारे, सचिव सतीश शेपुंडे, माजी अध्यक्ष नामदेव काप, मनोहर काप, सुरेंद्र काप, राजेश काप, लक्ष्मण शिंदे, प्रचित मिसाळ, नेहा पतारे, महिला मंडळ अध्यक्ष दर्शना घागरूम, उपाध्यक्षा सुलभा काप, सचिव योगिता पतारे, खजिनदार विशाखा, सुप्रिया पतारे, सरपंच सायली घाग, म ाजी अध्यक्ष विठोबा काप यांचे सह शिक्षक आणि शिक्षक इतर कर्मचारी विद्यार्थी ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर ग्रंथ दिंडी चरई बुद्रुक या गावांमध्ये आणि परिसरामध्ये काढण्यात आली पालखीमध्ये ठेवलेल्या पुस्तकांचे पूजन सुवासिनींचे हस्ते करण्यात आले त्यानंतर ग्रंथ दिंडीची मिरवणूक सर्व गावांमधून काढण्यात आली. सदर उपक्रम राबवण्याचा उद्देश हा आहे की विद्यार्थ्यांमध्ये तसेच ग्रामस्थांमध्ये वाचन प्रेरणा निर्माण व्हावी आणि विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वाचन करावे आणि माहिती आणि ज्ञान अर्जित करावे याप्रसंगी ग्रामस्थ, महिला, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता मृदंगाच्या निनादात हरिनामाच्या गजरात ज्ञानोबा माऊली तुकारामाच्या जयघोषणात समारोप करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉक्टर शेख यांनी केले असून सूत्रसंचालन डॉ. सचिन बंगाळे यांनी केले तर आभार कॉलेजचे ग्रंथपाल शत्रुघ्न ढवण यांनी मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# आधार कार्ड केंद्र सुरू करण्याची मागणी

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल पंचायत समिती कार्यालयात आधार कार्ड केंद्र पूर्ववत चालू करण्याची मागणी पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र सदानंद पाटील यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

पनवेल तालुक्यातील ग्रामीण विभागाच्या गोरगरीब, गरजू ग्रामस्थांच्या सोयीसाठी पनवेल पंचायत समिती कार्यालयात आधार कार्ड केंद्र उघडण्यात आले होते. मात्र हे केंद्र डिसेंबर २०२४ पासून कोणतीही पूर्वकल्पना न देता परस्पर बंद करण्यात आले. याबाबत अनेकांच्या तक्रारी आलेले आहेत. ग्रामीण भागातील अनेक गरजू नागरिकांची गैरसोय होत आहे. तरी हे आधार केंद्र विना विलंब पूर्ववत चालू करण्यात यावे अशी मागणी पनवेल तालुका मंडळ भाजपाचे सरचिटणीस भूपेंद्र पाटील यांनी केली आहे.

# निवडक

## रोह्यातून २१ वर्षीय तरुण बेपत्ता

**रोहा :** आजारी असलेल्या आजीला बघण्यासाठी अष्टमी येथे आलेला २१ वर्षीय तरुण रोहे शहरातून बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. लक्ष्मी मनोहर मोरे असे ७० वर्षीय आजीचे नाव असून ती अष्टमी रेल्वे स्टेशन शेजारी राहते. ती सतत आजारी पडत असल्यामुळे पुणे जिल्ह्यातील दौड येथे राहणारा नातू चेतन शिंदे हा डिसेंबर महिन्यात रोह्यात आला होता. यादरम्यान दि.१६ डिसेंबर रोजी पहाटेच्या सुमारास बाथरूमला जाऊन येतो असे सांगून निघून गेला.त्यानंतर तो पुन्हा घरी आलाच नाही. त्याचा सर्वत्र शोध घेतला असता तो कोठेही आढळून आला नाही. या विषयी रोहा पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा. एस.आर. सकपाळ करित आहेत.



## सेझ विरोधी संघर्ष समितीची सभा

**खरोशी :** निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर प्रथमतः सेझ विरोधी संघर्ष समितीची सभा ॲड. नंदू म्हात्रे यांच्या निवासस्थानी संपन्न झाली. या सभेला सुमारे ५० सभासद उपस्थित होते. संघर्ष समितीचे माजी अध्यक्ष दिलीप पाटील व माजी सचिव आर.के. पाटील यांच्या निधनाने एक पोकळी निर्माण झाली. त्यामुळे खारे पाट, हमरापुर विभाग, साई विभाग यामध्ये समन्वयाचा अभाव दिसत होता. तो भरून काढण्यासाठी आणि येणारे गेल पाइप लाइन, तिसरी महामुंबई, सेझ, मेट्रो, प्रकल्प, विरार अलिबाग कॉरिडॉर, कांदल वन, वनखात्याचे हवाई पाहणी अशे अनेकप्रश्न भविष्यात उद्भवणारे आहेत.त्याचा सामना करायचे झाल्यास शेतकरी वर्गाची शक्ती एकत्रित राहिली पाहिजे. तरच शेतकरी वाचेल ही भूमिका या सभेत मांडण्यात आली. तसेच, कोणताही लोकप्रतिनिधी आत्तापर्यंत सेझ जमिनी ताब्यात देण्यात यशस्वी झाला नाही, हा नाराजीचा सुर होता. त्यामुळे आत्ता आपण एकसंघ राहून आपले प्रश्न सरकार दरबारी ठामपणे मांडले पाहिजे. असे मत या बैठकीत मांडण्यात आले आहे.



## ‘उड्डाण’ स्नेहसंमेलनात प्रीतम म्हात्रे यांची उपस्थिती

**पनवेल :** जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या हिमांशू दिलीप पाटील इंग्रजी माध्यमिक शाळेचे ‘उड्डाण’ वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच पार पडले. या स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून शेतकरी कामगार पक्षाचे नेते तथा पनवेल महानगरपालिका माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी भेट दिली. यावेळी त्यांच्या सोबत शाळा कमिटी चेअरमन दिलीप पाटील, मुख्यधापिका निशा पोलेकर, संजय सांगळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी या सांस्कृतिक महोत्सवात विविध कलाकृती सादर केल्या. आज ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाचे शिक्षण घेत आपल्या विद्यार्थ्यांकडून कलेचा वारसा जोपासला जात आहे हे पाहून शाळा देत असलेल्या शिक्षण सेवेबाबत समाधान वाटत असल्याचे मत प्रीतम म्हात्रे यांनी व्यक्त केले आहे.



## पालिकेची विशेष स्वच्छता मोहीम

**पनवेल :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांच्याशी दुरदृष्य (व्हीसी) प्रणालीद्वारे संवाद साधून आपाआपल्या कार्यालयांमध्ये सात कलमी कार्यक्रम राबविण्यास सांगितले आहे. यानुसार आयुक्त मंगेश चितळे यांनी सर्व अधिकाऱ्यांची नुकतीच मुख्यालयात बैठक घेऊन सात कलमी कृती कार्यक्रम राबविण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार प्रामुख्याने महापालिकेची सर्व कार्यालये परिसर साफसफाई व सौंदर्यीकरण, फर्निचर दुरुस्ती तसेच स्वच्छतेच्या दृष्टिने स्वच्छता मोहीम घेण्याबाबत आदेशात करण्यात आले आहे. तसेच, पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये ही स्वच्छता मोहिमेची अंमलबजावणी करणेकामी निर्देशित करण्यात आले आहे. त्यानुसार पनवेल म हापालिकेच्या मुख्यालयात स्वच्छता मोहीम घेऊन तेथील खुप दिवसांपासुन पडून असलेले व वापरात नसलेले कपाटे, खुर्च्या-फर्निचर इत्यादी साहित्य निष्कासित करण्यात आले. तसेच, प्रभाग समिती-ड कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, भिंगारी कार्यालयांमध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच, प्रभाग १० कळंबोली प्रभाग कार्यालय येथे मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम घेण्यात आली.

### पिरकोन-आवरे रस्त्याच्या रूंदीकरणाला सुरूवात

# मुरूम मातीबरोबर निकृष्ट दर्जाचा भराव

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

**उरण पूर्व विभागातील पिरकोन-आवरे या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आखत्यारीत येणाऱ्या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. मात्र, या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामासाठी मुरूम मातीबरोबर कुठल्यातरी बांधकामाचा निकृष्ट दर्जाचा भराव सर्रासपणे वापरत असल्यामुळे नागरिकांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.**



याबाबत माजी सरपंच वैभवी म्हात्रे तसेच मानव विकास परिषदेचे रायगड जिल्हाध्यक्ष नंदकुमार म्हात्रे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे नरेश पवार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी संबंधित शाखा अभियंतांना पाहणी करून कारवाई करायला सांगितले असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, या रस्त्याच्या रुंदी करण्याच्या कामामुळे विजेचे पोल मध्यभागी येऊन अपघाताचा धोका होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही येथील नागरिकांमधून बोलले जात आहे. तसेच, या मुख्य रस्त्याच्या खालून नळाची पाईपलाईन गेली आहे. त्यावर आता रस्त्याच्या रुंदीकरणाचा भराव होत आहे. त्यामुळे ही पाईपलाईन अधिकच गाडली जाणार असून, दुरुस्तीच्या वेळी मोठा प्रश्न निमाण होणार आहे. या पाईपलाईन संदर्भात तसेच इलेक्ट्रिक खांब हटविण्याबाबत, इलेक्ट्रिक बोर्डाच्या अधिकाऱ्यांकडे संबंधितांनी विद्युत खांबांविषयी तसेच पाईपलाईन बाबत पुनाडे आठगाव पाणी कमिटीकडे चर्चा केली की नाही, याबाबत काहीच माहित नसल्याचे वैभवी म्हात्रे व नंदकुमार म्हात्रे यांनी सांगितले आहे.

> **रस्त्याच्या रुंदीकरणाचे हे काम निकृष्ट दर्जाचे असून संबंधितांनी या कामात लक्ष घालून वेळीच हे काम थांबवून घ्यावे. वरिष्ठांनीही या रस्त्याची सखोल चौकशी करून होत असलेले निकृष्ट दर्जाचे हे काम त्वरित थांबवावे.**
> **- वैभवी म्हात्रे, माजी सरपंच, आवरे**

पिरकोन-आवरे या रस्त्यासाठी दोन्ही बाजूंनी जी जमीन संपादित करण्यात आली आहे, त्यानुसार या रस्त्याचे दोन्ही बाजूंनी सारखेच रुंदीकरण करून घ्यावे. मात्र, असे न होता काही नागरिकांची वॉल कंपाऊंडे तोडण्यात येत आहेत. तर, काही नागरिकांची वॉल कंपाऊंडे वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे, रुंदीकरणासाठी रस्त्यालगतची बांधकामे तोडत असताना यात राजकीय पक्षपातीपणा होत असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. याबाबत आवरे ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच वैभवी म्हात्रे यांनी ठेकेदाराला विचारणा केली असता, ठेकेदार थातूरमातूर उत्तरे देऊन वेळ मारून नेत असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

## खारघर टेकडीवर ट्रॅप कॅमेरे

**। पनवेल । वार्ताहर ।**

ठाणे वन विभागाचे कर्मचारी, वन्यजीव वॉर्डन आणि स्वयंसेवकांचा समावेश असलेल्या १५ सदस्यांच्या गटाने केलेल्या सर्वेक्षणात खारघर टेकडीवरील मोकळ्या भूखंडावर बिबट्याच्या हलक्या पायाच्या खुणा आढळून आल्या आहेत. त्यामुळे, खारघर टेकडीवर दोन ठिकाणी ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले असल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली आहे.

खारघर टेकडीवर शनिवारी (दि.५) मध्यरात्री फणसवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सीसीटीव्हीमध्ये बिबट्या दिसल्यानंतर शोध मोहीम हाती घेण्यात आली होती. तीन दिवसांच्या मोहिमेनंतर फणसवाडी आणि ओवे गावादरम्यानच्या टेकडीवर असलेल्या मोकळ्या भूखंडावर हलक्या पाऊलखुणा दिसल्या आहेत. टेकडीच्या भागात वेगवेगळ्या घनतेच्या कोरड्या गवतांसह तीन मोठे मोकळे भूखंड आहेत. दरम्यान, ज्या भागात बिबट्याचा वावर असल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले होते त्या भागापासून १० किलोमीटर अंतरावर बिबट्याच्या पाऊल खुणा आढळून आल्या आहेत. वन विभागाचे कर्मचारी आणि स्वयंसेवकांचा गट पायाच्या खुणा आणि बिबट्याचा मागोवा घेत आहेत. यावेळी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास गटाला मदत करण्यासाठी एक रुग्णवाहिका देखील तैनात करण्यात आली होती.

> **हलक्या पाऊलखुणा आढळून आल्यामुळे आतापर्यंत दोन ठिकाणी ट्रॅप कॅमेरे बसवण्यात आले आहेत. तसेच, टीम तर्फे सर्वेक्षण देखील सुरूच ठेवण्यात आले आहेत.**
> **- गजानन पांढरपट्टे, परिक्षेत्र वनाधिकारी, पनवेल**



**पनवेल रेल्वे स्थानकाचा कायापालट होत असून प्रगती पथावर कामे सुरु आहेत. येत्या आठवड्यात नवीन पादचारीचे लोकार्पण होणार आहे. तर, पनवेल स्थानकातील सफेद रंगची जुनी इमारत तोडण्यात येणार असून बाजूला उभारण्यात आलेल्या नवीन इमारतीत तिकीट घर हलवले जाणार आहे. तसेच, कर्जत-पनवेल रेल्वे मार्गाचे काम जोरात सुरु आहे. (छायाचित्रः राजेश डांगले)**

## तरुणांना आपत्कालीन व्यवस्थापनचे प्रशिक्षण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

आपत्ती काळात कोणावरही आपत्तीला तोंड देण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे नेरळ येथील करिअर टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून परिसरातील १०० तरुणांना आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात आले.त्याचवेळी आपत्ती काळात मदत व्हावी म्हणून निहारिया फाऊंडेशनकडून सेफ्टी किट भेट देण्यात आले.



नेरळ-कशेळे राज्यमार्गावर करिअर टेक्निक इन्स्टियुट असून या इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तंत्र प्रशिक्षण दिले जाते. सध्या निहारिका फाऊंडेशनकडून करिअर टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट संस्था चालविली जात आहे. या संस्थेच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील तरुणांना आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या १०० तरूणांना प्रमाणपत्र वाटप करण्याचा कार्यक्रम संस्थेच्या आवारत करण्यात आला. यावेळी माजी सभापती अमर मिसाळ, संतोष कांबरी, गणेश भोपी, अविनाश डायरे, आतिष आगिवले, रंजना भोपी, गणेश भोपी आदी मान्यवर उपस्थित होते.

## ग्रामसेवकाचे तडकाफडकी निलंबन

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातील वराठी ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाला रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भारत बास्टेवाड यांनी निलंबित केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी घेतलेल्या आढावा बैठकीला परवानगी न घेता गैरहजर राहणे, पंधराव्या वित्त आयोगाचा निधी खर्च न करणे, प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी न करणे असे आरोप त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करताना ठेवण्यात आले आहेत.

राज्याच्या मुख्यमंतत्र्यांनी १०० दिवसांचा महत्वाकांक्षी उपक्रम जाहीर केला आहे. या उपक्रमांतर्गत शंभर दिवसांत नागरिकांच्या सोयीसुविधा, प्रशासनातील सुधारणा या बाबींवर भर दिला जात आहे. त्या संदर्भात महाड आणि पोलादपूर तालुक्यातील ग्राम पंचायत अधिकाऱ्यांची आढावा बैठक मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी बोलावली होती. महाड तालुक्यातील वराठी ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी मोतिसिंग लहानुजी भस्मे हे या बैठकीला पूर्व परवानगी न घेता गैरहजर राहिले होते. त्यांचा कामचुकारपणा देखील या बैठकीत आढळून आला. त्यामुळे त्यांना तात्काळ निलंबित करण्याचे आदेश डॉ. बास्टेवाड यांनी दिले.

या आढावा बैठकीला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, ग्राम पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, महाडच्या गटविकास अधिकारी डॉ. स्मिता पाटील, पोलादपुरच्या गटविकास अधिकारी दिप्ती गाट, सहाय्यक गटविकास अधिकारी नामदेव आण्णा कटरे तसेच सर्व विस्तार अधिकारी, शाखा अभियंता उपस्थित होते.

## अपघातात पादचाऱ्याचा मृत्यू

**। पनवेल । वार्ताहर ।**

मुंबई-पुणे महामार्गावर आदई गावाजवळ खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत चारचाकी वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत. यातील एनोव्हा कारचालक जितेंद्र चिंभा शिंदे हे पुणे बाजूकडे जात असताना अचानक एक अज्ञात पादचारी इसम (वय अंदाजे ५०) रस्ता पार करीत असताना समोर आल्याने कार चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि त्या इसमाना धडक बसली. या अपघातात पादचारी इसमाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याला रस्त्याचे बाजूला घेऊन आयआरबी म्बुलन्सच्या डॉक्टरांनी त्याला तपासून जागेवरच मृत घोषित केले. पादचारी मयत इसमास खाजगी रुग्णवाहिकेने उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत.

## अंजुमन महाविद्यालयात रस्तेसुरक्षा जनजागृती

**। कोर्लई । वार्ताहर ।**

संपूर्ण देशात रस्ता सुरक्षा अभियान महिनाभर राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रायगड जिल्हा पोलिस दल आणि जिल्हा वाहतूक शाखा रायगड-अलिबाग व लायन्स क्लब श्रीबाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शनिवारी (दि.११) रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यशाळेमध्ये पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर व जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार प्रशांत म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा आणि वाहतूक नियम विषयी सविस्तर माहिती दिली. या कार्यशाळेचे आयोजन जैनुद्दीन कादरी व डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमाला अल्ताफ मलिक, इम्रान मलिक, इस्माईल शेख व तौसिफ़ फत्ते, फौजदार संतोष गायकवाड, सहाय्यक फौजदार महेंद्र खोत, पोलिस हवालदार किशोर पठारे आणि मंगेश कावजी उपस्थित होते.

### व्यापाऱ्यांच्या समयसूचकतेमुळे गोरख धंदा उघडकीस | दोन परप्रांतीय तरूणांना अटक

# बनावट डाळ, बासमती तांदूळाची विक्री

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत येथील दहिवली नाका येथे एका टेम्पोमधून दोन परप्रांतीय तरूण तूरडाळ तसेच बास्मती तांदूळ यांची विक्री करत होते. याबाबत माहिती मिळताच कर्जत शहरातील व्यापाऱ्यांनी त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. त्यावेळी त्या व्यापाऱ्यांना लाख असलेली तूरडाळ आणि बनावट बासमती तांदूळ यांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आहे. तसेच, धान्य विक्रीसाठी कोणत्याही प्रकारचे शासकीय परवाने त्या दोघांकडे नसल्याने त्या दोन्ही तरुणांना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.**



कर्जत शहरातील दहिवली येथील छ. संभाजी महाराज चौकाच्या बाजूला असलेली मोकळ्या जागेत टेम्पो उभा करून त्यात आणलेली तूरडाळ आणि बासमती तांदूळ यांची विक्री केली जात होती. परप्रांतीय असलेले दोन तरुण गेले काही दिवस टेम्पोमधून आणलेली तूरडाळ आणि बासमती तांदूळ कमी किमतीत विकत होते. त्यामुळे गेली काही दिवस त्या ठिकाणी ग्राहकांची गर्दी होत होती. याची माहिती कर्जत शहरातील मोठ्या घाऊक व्यापाऱ्यांना मिळाली होती. त्यातील काही व्यापारी त्या ठिकाणी पोहचले असता हिंदी भाषेत संवाद साधणाऱ्या त्या दोन तरुणांकडे असलेली तूर डाळ ही लाख असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी त्याबाबत कर्जत पोलिसांना कळविले. त्याचवेळी त्या टेम्पोमध्ये असलेले बासमती तांदूळ हे देखील बनावट असल्याचे आढळून आले.

दरम्यान, पोलिसांनी त्या दोन्ही तरुणांकडे तूरडाळ विक्रीचे परवाने, खरेदी केल्याची पावती तसेच धान्य वितरण करण्याचा परवाना मागितला. मात्र, त्यापैकी एकही वस्तू परप्रांतीय तरुणांकडे नव्हती. शेवटी त्या दोन्ही तरुणांना त्यांच्या टेम्पोसह कर्जत पोलीस ठाण्यात नेण्यात आले. कर्जत शहरातील व्यापाऱ्यांच्या समयसूचकतेमुळे दहिवली येथे सुरु असलेला बनावट तूरडाळ आणि बासमती तांदूळाचा गोरख धंदा उघडकिस आला आहे.

## स्वराज्य संग्रामचा आंदोलनाचा इशारा

**। महाड । प्रतिनिधी ।**

अरबी समुद्रातील शिवस्मारकाचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जलपूजन केल्यानंतर आठ वर्षापासून रखडले आहे. आता महायुतीचे सरकार स्थीरस्थावर झाल्यावर आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असून या कामाला त्वरीत प्रारंभ करण्याची मागणी करणार आहोत. त्यानंतरही जर या कामाला प्रारंभ झाला नाही, तर आमच्या समोर आंदोलन छेडण्याखेरीज पर्याय नसेल, असा इशारा स्वराज्य संग्राम पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तानाजीराव शिंदे यांनी रविवारी (दि.१२) पाचाड येथे बोलताना दिला आहे.

तसेच, देशात समान नागरी कायदा लागू व्हावा, मराठ समाजाला आरक्षण मिळावे, शेतकऱ्यांचे कर्ज माफ करून सातबारा कोरा करण्यात यावा, कंत्राटी नोकरभरती बंद करण्यात यावी, सारथी संस्थेची व्याप्ती वाढविण्यात यावी, महिलांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी कायम स्वरूपी उपाययोजना करावयात, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ सक्षम करण्यात यावे, किल्ले रायगडवरील जगदिश्वर मंदिराचा जीर्णोद्धार करावा अशा आमच्या पक्षाचा अजेंडा असल्याचे शिंदे यांनी सांगितले आहे. या मागण्या पुर्ण न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा शिंदेंकडून देण्यात आला.

# देवेंद्रांचा नवा कार्यक्रम

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलिकडेच नोकरशाहीसाठी सात कलमी कृती कार्यक्रम दिला. त्यांचे सरकार नवीन आहे. तीनचतुर्थांश बहुमत आहे. त्यामुळे जनतेला काहीतरी करून दाखवल्यासारखे तर वाटले पाहिजे. त्यामुळे हा कार्यक्रम आला आहे. सरकार गतिमान आणि कार्यक्षम होण्यासाठी हे सगळे केले जात आहे असे ते म्हणाले. पण या कार्यक्रमातले सातही मुद्दे अगदी सामान्य आहेत. स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षे लोटली आणि आपण एकविसाव्या शतकात वावरतो. आता दुनियाभर एआयची चर्चा चालते. मात्र आपली नोकरशाही आणि समाज अजूनही कसा एकोणिसाव्या शतकातच आहे हे या कार्यक्रमावरून लक्षात येते. सरकारी कार्यालये स्वच्छ ठेवा, नागरिकांच्या तक्रारी त्वरीत निकालात काढा, सरकारच्या महत्वाच्या प्रकल्पांना भेटी द्या अशा प्रकारच्या सूचना त्यात करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्र्यांनी ज्या बैठकीत ही घोषणा केली तिला सर्व सचिव, जिल्हाधिकारी, आयुक्त, पोलिस प्रमुख इत्यादी हजर होते. हे सर्व पाहता कॉलेजात जाणाऱ्या मुलाला रोज आंघोळ कर, नीट कपडे घाल अशा सूचना कराव्यात तसा हा प्रकार आहे. शिवाय, हेच फडणवीस २०१४ पासून, मधला अडीच वर्षांचा काळ वगळता, सातत्याने सत्तेच्या केंद्रस्थानी आहेत. देशात आम्ही परिवर्तन घडवले असे म्हणणाऱ्या भाजपचे ते नेते आहेत. आता त्यांना पुन्हा इतक्या प्राथमिक पातळीवरच्या सूचना नोकरशाहीला कराव्या लागतात यावरून नक्की काय आणि कुठे बदलले असा प्रश्न कोणालाही पडेल. सरकारी कार्यालयात जाणे हा सर्वच नागरिकांसाठी कायम त्रासदायक अनुभव असतो. कोणतेही काम कसे होणार नाही किंवा शक्य तितके उशिरा कसे होईल हे पाहणे हेच जणू अनेक कर्मचाऱ्यांचे मुख्य सूत्र असते. अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर चाप ठेवणे अपेक्षित असते. पण तेही हीच मनोवृत्ती घेऊन वरवर गेलेले असतात. शेतकऱ्यांना सातबारा, फेरफार इत्यादींसाठी तलाठ्यांकडे वारंवार चकरा माराव्या लागतात. उत्पन्नाचे प्रमाणपत्र, पीकपाहणी, पीक नुकसानीची नोंद इत्यादी अनेक निमित्ताने विविध कार्यालयांचे तोंड पाहावे लागते. पण या प्रत्येक कामात त्यांना कधी ना कधी अडवणुकीचा अनुभव येतो. यावर कसा इलाज करणार याचा खुलासा फडणवीसांच्या या कार्यक्रमात होत नाही.

### माहिती अधिकाराचा बोजवारा

या कार्यक्रमात जनतेला तात्काळ माहिती द्यावी असा एक आदेश आहे. प्रत्यक्षात सरकारी माहिती देण्याबाबत नोकरशाही अत्यंत टाळाटाळ करते असे सार्वत्रिक अनुभव आहे. २००५ चा माहिती हक्क कायदा यंदा वीस वर्षांचा होईल. पण त्याची स्थिती अत्यंत करुण आहे. देशभरातील २९ माहिती आयोगांपुढे चार लाखांहून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यात महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. राज्यातील तब्बल एक लाख आठ हजार तक्रारी प्रलंबित आहेत. याचा अर्थ इतक्या अर्जदारांनी मागितलेली माहिती मिळालेली नाही किंवा त्यांना वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या आहेत. सप्टेंबर २०२४ च्या मासिक अहवालानुसार, माहितीसाठीच्या दुसऱ्या अपिलाचे तब्बल ८२ हजार अर्ज विभागीय आयुक्तांकडे प्रलंबित आहेत. कोकण विभागातील चार हजार अर्जांचा त्यात समावेश आहे. एखादा अर्जदार सरकारकडून एखाद्या विषयाची माहिती मागतो तेव्हा त्याला तिच्या आधारे पुढे काही काम करायचे असते. पण ही माहिती मिळण्यातच अर्जदारांना इतके तंगवायचे की त्यांनी पुन्हा सरकारी कार्यालयांपुढे फिरकू नये असे हे धोरण आहे. फडणवीसांना आपला कारभार सुधारायचा असेल तर पहिल्यांदा त्यांनी या विषयाला प्राधान्य द्यायला हवे. विशिष्ट दिवसात माहिती न दिल्यास कडक कारवाई केली जाईल असे सांगून त्याची अंमलबजावणी झाल्याचे दिसले पाहिजे. पण सरकारमध्येच तशी इच्छा नाही. माहिती आयुक्तांची तसेच माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांची अनेक पदे सरकारने भरलेलीच नाहीत. त्यामुळे बाकीच्या नोकरशाहीला माहिती न देण्यासाठी सबबी मिळत राहतात. आतादेखील शेवटचा माहिती अहवाल बहुदा सप्टेंबरमध्ये आला आहे. त्यानंतर राज्यात निवडणुकांचे वातावरण होते. त्यामुळे तीन महिने काहीच कारभार झालेला नाही. डिसेंबरनंतर याला गती येण्याची अपेक्षा होती. पण आधी खातेवाटप रखडले. नंतर अनेक मंत्र्यांनी कारभारच सुरू केलेला नाही. अशा स्थितीत नोकरशाहीला कामाला लावणार कोण हा प्रश्न आहे.

### भ्रष्टाचाराबाबत मौन

या कार्यक्रमात उद्योजकांना चांगली वागणूक देण्याचा उल्लेख आहे. हे मुद्दाम सांगितले जाते. कारण उद्योग राज्यात पैसे आणतात. त्यातला काही वाटा राजकारण्यांनाही मिळतो. हेच उद्योग रोजगार निर्माण करतात आणि राजकीय पक्षांना त्यांचे श्रेय घेता येते. त्यामुळे उद्योजकांना दुखावू नका हे आवर्जून सांगितले गेले आहे. हे स्वागतार्ह असले तरी उद्योजकांसाठी असा स्वतंत्र उल्लेख करणे हे विचित्र आहे. उद्योजकच कशाला, शेतकरी, नोकरदार, छोटे व्यावसायिक, रस्त्यावरचे गरीब लोक या सर्वांनाच सरकारी कार्यालयात चांगली वागणूक मिळायला हवी. तेही आपापल्या परीने राज्याच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावत असतात. पण सरकारला काळजी आहे ती उद्योगांची. याच संदर्भात आणखी एक नोंदण्यासारखा मुद्दा म्हणजे भ्रष्टाचाराचा कोठेही नसलेला उल्लेख. भ्रष्टाचारासंदर्भात आता राजकारणी, सत्ताधारी व विरोधक यांनी बोलणे बंदच केले आहे. तळागाळातले सामान्य कार्यकर्तेही या प्रश्नाशी झुंजताना थकून गप्प झाले आहेत. पण सरकारी कार्यालये, पोलिस यंत्रणा, इस्पितळे इत्यादींमधील भ्रष्टाचार हा कर्करोगासारखा गंभीर प्रश्न आहे. पैसे खाऊन का होईना कामे लवकर वा किमान वेळेवर होऊद्यात असे लोक सर्रास म्हणतात. पण हा प्रश्न तेवढ्यापुरताच मर्यादित नाही. भ्रष्टाचारातून कम अस्सल मालांच्या खरेद्या होतात, रस्ते पुन्हा पुन्हा उखडतात, सरकारी इस्पितळातील सेवांचा बोजवारा उडतो आणि लोकांना नाइलाजाने आपल्या मुलांना खासगी शाळांमध्ये घालावे लागते. एसटीसारखी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था हीदेखील भ्रष्टाचाराने पोखरून नष्ट होऊ घातली आहे. याला आळा घालण्यासाठी फडणवीसांनी एखाद्या धडक कार्यक्रमाची आखणी केली तर जनता त्यांना दुवा देईल. पण सरसकट अर्ज करतील त्यांना लाडक्या बहिणीचे पैसे देऊन निवडणुका जिंकणारे फडणवीस, शिंदे आणि पवार ही मंडळी कोणत्याही भ्रष्टाचाराबाबत काही ठोस भूमिका घेऊ शकतील का हा महत्वाचा सवाल आहे. फडणवीस यांच्या कार्यक्रमाचा १५ एप्रिलला आढावा घेतला जाणार आहे. त्यावेळी कितपत प्रगती झाली हे कळेलच. याच फडणवीसांना पहिल्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात लोकांना सरकारी सेवांचा हक्क आहे असे म्हणून एक कार्यक्रम सुरु केला होता. त्याचे नावही आता कोणी घेत नाही. या नव्या कार्यक्रमाची अवस्था त्याच्यासारखीच होण्याची शक्यता अधिक आहे.

## विचार

# करमहसुलात समाधानकारक वृद्धी

**करमहसूल लक्षणीयरीत्या वाढणे ही स्वागतार्ह बाब आहे. अप्रत्यक्ष करांऐवजी प्रत्यक्ष करांमधून मिळणारा महसूल वाढणे, ही अधिक चांगली बाब आहे. अलिकडेच अग्रिम करसंकलन २१ टक्क्यांनी वाढून साडेसात लाख कोटी रुपयांवर गेले. महसूल विभागाची कार्यक्षमता वाढल्याचे हे लक्षण आहे. तसेच आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचाही फायदा होत आहे. मात्र सामान्यांना वाढत्या करबोज्यातून दिलासा देण्याचे धोरण हवे.**

हेमंत देसाई

देशाचे निव्वळ प्रत्यक्ष करांचे संकलन १७ डिसेंबर २०२४ पर्यंत वार्षिक तुलनेत १६ टक्क्यांनी वाढून जवळपास १६ लाख कोटी रुपयांवर गेल्याची माहिती केंद्रीय अर्थखात्याने दिली आहे. करमहसूल लक्षणीयरीत्या वाढणे, ही स्वागतार्ह बाबच आहे. अप्रत्यक्ष कर हे सामान्य लोकांना झळ पोहोचवणारे असतात. त्याऐवजी प्रत्यक्ष करांमधून मिळणारा महसूल वाढणे, ही अधिक चांगली बाब आहे. प्राप्तिकराच्या अग्रिम कराचा तिसरा हप्ता भरला गेल्याने, एकूण करमहसूल वाढला आहे. १५ डिसेंबरला या तिसऱ्या हप्त्याद्वारे अग्रिम करसंकलन २१ टक्क्यांनी वाढून साडेसात लाख कोटी रुपयांवर गेले आहे. यंदा वैयक्तिक प्राप्तिकराचे असे प्रमाण जवळपास आठ लाख कोटी रुपये तर कंपन्यांकडून साडेसात लाख कोटी रुपये भरले गेले आहेत. कंपनी करात यंदा ८.६ टक्के तर वैयक्तिक प्राप्तिकर संकलनात उत्तम, म्हणजे २२ टक्क्यांची वाढ झाली आह भांडवली बाजारातील रोखे उलाढाल कराच्या माध्यमातून ४० हजार कोटी रुपयांची भर पडली आहे, ज्यात वार्षिक तुलनेत ८५ टक्के अशी सणसणीत वृद्धी नोंदवण्यात आली आहे. या कालावधीत प्राप्तिकर विभागाने तीन लाख ३९ हजार कोटी रुपयांचा परतावा दिला असून, त्यात वार्षिक ४२ टक्क्यांची वाढ झाली आहे. कंपनी कर, वैयक्तिक प्राप्तिकर आणि एसटीटी यासह एकूण प्रत्यक्ष करसंकलन १९ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. ते १ एप्रिल २०२३ ते १७ डिसेंबर २०२३ या दरम्यान झालेल्या संकलनापेक्षा २० टक्क्यांनी वाढले आहे. महसूल विभागाची कार्यक्षमता वाढल्याचे हे लक्षण आहे. तसेच आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचाही फायदा होत आहे.

केंद्र सरकारने विद्यमान आर्थिक वर्षासाठी २२ लाख कोटी रुपयांचे प्रत्यक्ष कर संकलनाचे लक्ष्य निर्धारित केले आहे. आतापर्यंत संकलनात झालेली वाढ पाहता, निर्धारित लक्ष्य निश्चितच गाठले जाईल, असे केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष रवी अग्रवाल यांनी म्हटले आहे. त्यांच्या म्हणण्यात नक्कीच तथ्य आहे. गेल्या अर्थसंकल्पात करदात्यांना मोठा दिलासा देत, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी प्रमाणित वजावटीची मर्यादा ५० हजार वरून ७५ हजार रुपये केली होती. नवीन करप्रणाली अंतर्गत हा बदल करण्यात आला. त्यामुळे सरकारला सात हजार कोटी रुपयांचा महसूल गमवावा लागला असून, चार कोटी पगारदारांना त्याचा फायदा होत आहे, अशीही माहिती त्यांनी दिली होती. अर्थसंकल्पात टॅक्स स्लॅबमध्ये बदल करण्यात आले. १५ लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असल्यास ३० टक्के कर लागू केला गेला. नवीन करपद्धतीत पगारी कर्मचाऱ्यांची १७ हजार ५०० रुपयांपर्यंत वार्षिक बचत होत आहे. मागील अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांमधून केंद्र सरकारला सर्वाधिक, म्हणजे ६३ टक्के उत्पन्न मिळाले. याशिवाय २७ टक्के रक्कम कर्ज आणि इतर दायित्वामधून येणार होती. तर नऊ टक्के रक्कम निर्गुंतवणुकीसारख्या गैरमहसुलातून आले. केंद्राला अप्रत्यक्ष करांमध्ये वस्तू आणि सेवा कर, म्हणजे जीएसटीमधून १८ टक्के उत्पन्न मिळाले. याशिवाय उत्पादन शुल्कातून पाच टक्के व सीमा शुल्क आकारणीतून चार टक्के उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले होते. कॉर्पोरेट आणि वैयक्तिक आयकरासह प्रत्यक्ष करातून एकूण ३६ टक्के उत्पन्न मिळणार आहे. त्यामध्ये आयकरातून १९ टक्के तर कॉर्पोरेट करामधून १७ टक्के उत्पन्न येईल, असे मागच्या अर्थसंकल्पात नमूद करण्यात आले होते. धर्मादाय संस्था, परदेशी जहाज कंपन्या यासाठी नवी कररचना प्रस्तावित केल्यानंतर, कॉर्पोरेट टॅक्स कर कमी करण्यात आला आहे. कारण सरकारला अधिक गुंतवणूक आहे हवी आहे, असा युक्तिवाद करण्यात आला. परदेशी कंपन्यांवरील कॉर्पोरेट कर ४० वरून ३५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला. परंतु एवढे असूनही परदेशी गुंतवणूकदारांनी सप्टेंबरअखेरपासून भारतीय समभागांमधून अंदाजे एक लाख २० हजार कोटी रुपये काढून घेतले आहेत. केवळ नोव्हेंबर २०२४ मध्येच त्यांनी २८ हजार कोटी रुपये मूल्यांच्या समभागांची विक्री केली आहे. परकीय गुंतवणूकदारांच्या निधीचे निर्गमन हे कशामुळे झाले? एक तर डोनाल्ड ट्रम्प यांचे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी पुनरागमन झाल्याने रुपयाच्या तुलनेत अमेरिकी डॉलर अधिकाधिक मजबूत होत आहे. ट्रम्प यांच्या ‘अमेरिका प्रथम’ धोरणाचा परदेशी गुंतवणूक आणि व्यापारावर नेमका काय परिणाम होऊ शकतो, याबद्दल अद्याप अनिश्चितता आहे. अमेरिकी रोखे ही जगातील सर्वात सुरक्षित गुंतवणूक मानली जाते. सध्या दहा वर्षे मुदतीच्या अमेरिकी रोख्यांवरील परताव्याचा दर पाच टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठेत परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी समभाग विक्रीचा मारा सुरू ठेवला आहे. या जोडीला चीनच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी तेथील सरकारच्या नवनवीन योजनांमुळे परदेशी गुंतवणूकदार हा भारतीय भांडवल बाजारच्या तुलनेत स्वस्त असलेल्या चिनी बाजाराकडे आकर्षित होत आहे. त्यामुळे आता शेअर बाजाराची आशा देशांतर्गत म्युच्युअल फंडांवरच अवलंबून आहे.

म्युच्युअल फंड संस्थांमधील व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता सप्टेंबर २०२४ अखेर ६७ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे तर एकूण इक्विटी म्युच्युअल फंडातील मालमत्ता ३१ लाख कोटी रुपयांवर गेली आहे. देशाचा करमहसूल वाढत आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. परंतु तो वाढवण्यासाठी आणखीही काही उपाय आहेत. अधिकाधिक भांडवली खर्च करण्यासाठी उत्पन्न वाढणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे देशाचे उत्पादन क्षेत्र विस्तारण्यासाठी परदेशी भांडवल गुंतवणुकीची गरज आहे. केवळ शेअर बाजारातच नाही, तर थेट कारखान्यांमध्ये भांडवल गुंतवणूक वाढणे अत्यंत आवश्यक आहे. कर गोळा करणे हा देशांसाठी सार्वजनिक महसूल मिळवण्याचा मुख्य मार्ग आहे. त्यामुळे मानवी भांडवल, पायाभूत सुविधा आणि व्यवसायांसाठी सेवांच्या तरतुदींमध्ये गुंतवणुकीसाठी वित्तपुरवठा करणे शक्य होते. तरीही अनेक संकटांमुळे विकसनशील देशांच्या महसुलात घट झाली असून अलिकडच्या वर्षांमध्ये त्यांचा खर्च वाढला आहे. सध्या जीडीपीच्या १५ टक्क्यांपेक्षा कमी कर जमा करणाऱ्या देशांमध्ये महसूल संकलन वाढवण्याची गरज आहे. कर आकारणीचा हा स्तर राज्याला व्यवहार्य बनवण्यासाठी आणि विकासाच्या मार्गावर आणण्यासाठी एक महत्त्वाचा टिपिंग पॉइंट आहे. करप्रणाली न्याय्य आहे, याची खात्री करून सरकारांनी महसूल जमा करणे, शाश्वत वाढ आणि अनुपालन खर्च कमी करणे यासारख्या उद्दिष्टांमध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे.

कर आणि करेतर उत्पन्न वाढवून सार्वजनिक खर्च भागवणे आवश्यकच असते. आर्थिक मंदी वा कोरोनासारखी संकटे असोत, त्या काळात सरकारी महसूल घटतो, म्हणूनच तर कोरोनाच्या काळात हे गुणोत्तर भारतात दहा टक्क्यांपर्यंत खाली आले होते. प्रगत देशांमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे प्रमाण अनुक्रमे ६५ टक्के आणि ३५ टक्के असे असते, तर भारतात ते आहे, अनुक्रमे ४८ टक्के आणि ५२ टक्के. याचा अर्थ भारतात तुलनेने सधन आणि उच्च मध्यमवर्गीय गटावर कमी भार असून गोरगरीब आणि निम्न मध्यमवर्गीयांवर अधिक भार आहे. गरिबांवर कमी भार आणि श्रीमंतांवर जास्त भार, हेच आर्थिक न्यायाचे तत्त्व असते. आर्थिक विषमता कमी करून अर्थव्यवस्था समतेच्या दिशेने नेण्यासाठी प्रत्यक्ष कर वाढवणे आणि अप्रत्यक्ष कर कमी करणे, हा खरा उपाय आहे. भारतातील ८३ टक्के लोक हे असंघटित किंवा अनौपचारिक क्षेत्रात काम करतात. ते प्रत्यक्ष करांच्या कक्षेत येतच नाहीत. भारतात जेमतेम तीन टक्के लोक कर भरतात. भारताच्या एकूण उत्पन्नात खालच्या ५० टक्के लोकांचा वाटा फक्त १५ टक्के आहे. यावरून देशात आर्थिक विषमता किती टोकाची आहे, हे लक्षात येते. बेहिशेबी व्यवहार, हवाला, काळा पैसा अशा मार्गाने विशिष्ट वर्ग प्रचंड श्रीमंत होत आहे. उलट वाढत्या महागाईमुळे गरिबांचा खिसा रिता होत आहे. भारतात सरासरी २० मतदारांमागे एक मतदार कर भरणारा असतो. हे प्रमाण नक्कीच वाढू शकते.

कर दर वाढवून उत्पन्न वाढवण्यापेक्षा करप्रणालीत सुगमता आणणे, संगणकीकृत पद्धतींचा वापर वाढवणे आणि करदात्यांवर अधिक विश्वास टाकणे, आवश्यभक आहे; मात्र अजूनही लाचखोरी आणि भ्रष्टाचाराची कीड नष्ट झालेली नाही. त्यासाठी ठोस प्रयत्न करण्याची गरज आहे. पूर्वीच्या काळात सर्वसामान्य करदात्यांना कर अधिकाऱ्यांच्या सतावणुकीला सामोरे जावे लागत असे. तंत्रज्ञानामुळे हे प्रमाण कमी झाले असून स्वतः देखील रिटर्न भरणे सोपे झाले आहे; मात्र प्रत्यक्ष कराच्या कक्षेत जास्तीत जास्त करदाते येतील, हे बघणे आवश्यक असून प्रत्यक्ष करमहसूल जेवढा वाढेल, तेवढा देशाच्या अर्थव्यवस्थेला त्याचा उपयोग होऊन, विकासासाठी तो पैसा खर्च करता येईल.

## चर्चा आजची

# रस्त्यांचे चौपदरीकरण गरजेचे

सुयोग आंग्रे

रायगड जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून नावारूपाला येत आहे. त्याचे कारण दळणवळणाची सहज उपलब्ध असणारी साधने आणि खिशाला परवडणारा प्रवास. गोव्याला जाताना वेळ आणि पैशांची बचत करता येत नाही . यामुळे वेळ आणि पैशाची बचत करण्यासाठी आणि पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी आपला रायगड जिल्ह्याचा बरा असे म्हणणाऱ्यांची संख्या वाढताना दिसत आहे. देश विदेशातील पर्यटक रायगड जिल्ह्यात पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी येतात. आनंद लुटतातहीपरंतु वाहतूक कोंडीचा फटका बसत असल्याने नाराजीची री ओढूनचमाघारी फिरतात. साहजिकच पर्यटकांचे म्हणणे रास्त आहे. कारण पर्यटन जिल्हा म्हणून उदयाला येणार रायगड जरा सर्वसंपन्न असावा असे वाटत असेल तर महामार्ग, राज्य मार्ग आणि अंतर्गत रस्ते निश्चित उत्तम स्थित असायला हवेत आणि तेही चौपदरीकरण केले असायला हवेत. तरच रायगड जिल्ह्याच्या पर्यटनातून विकास साधण्याचे शासनाचे स्वप्न साकार होईल.

रायगड जिल्ह्यातील महत्वाच्या मार्गांचा विचार केला तर सहजपणे आपल्या मुखी मुंबई गोवा महामार्गाचे नाव येते. एक तप म्हणजे तब्बल १४ वर्षे पूण झाली परंतु महामार्गाचे चौपदरीकरण काही पूर्ण झाले नाही. कोट्यवधी रुपयांचा चुराडा या महामार्गाच्या चौपदरीकरणात झळा आणि अजूनही होत आहे. पळस्पे ते पोलादपूर इतकाच काय तो महामार्गाचा भाग रायगड जिल्ह्यात येतो. पण या चौपदरीकरणासाठी आंदोलने, उपोषणे आणि मोर्चे काढण्यात आल्याचा इतिहास सर्वश्रुत आहे. हा महामार्ग झाला नाही पण अंतर्गत राज्यमार्ग आणि रस्ते देखील रुंदीकरण झालेले नाहीत. रायगड जिल्ह्यात यायचे झाले तर खोपोली, खालापूर पाली मार्गे माणगाव किंवा पाली चाकण मार्गे माणगाव असे जात येते हे महामार्ग बनवले आहेत. पण अद्यापही काही ठिकाणी रस्त्याच्या रुंदीकरणाच्या अडहचणींचे घर अर्धवट आहे. वडखळ अलिबाग रास्ता चौपदरीकरणाच्या प्रतीक्षेत आहे. अनेकदा केंद्रीयमंत्री गडकरी यांनी या रस्त्याबाबत घोषणा केल्या आहेत. कार्लेखिंडीत बोगदा असणारा हा रस्ता कधी होणार हे ज्योतिष्याला देखील सांगता येणार नाही. अलिबाग विरार कॉरिडॉर महत्वाकांक्षी प्रकल्प भूसंपादनाच्या कचाट्यात सापडला आहे. हा कॉरिडॉर झाला, तर पर्यटनाला अधिक उंचीची चालना मिळणार आहे. मांडवा ते अलिबाग हा रस्ता देखील आता चौपदरीकरण्यावर भर देणे गरजेचे आहे, कारण याचा मार्गाने सर्वाधिक पर्यटक अलिबाग मार्गे रायगड जिल्ह्यात प्रवेश करतात. पर्यटकांची वाहने याच रस्त्याने मार्गस्थ होतात. रस्ता अपेक्षेपेक्षा कमी रुंद असल्याने वाहतुकीला अडचण निर्माण होत आहे. अलिबागकडून मुरुडकडे जाण्यासाठी असलेला अलिबाग रोहा किंवा मुरूड रस्ता अरुंद असल्याने वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे.

अलिबाग रोहा रस्ता चौपदरीकरणाचे काम सुरु आहे. परंतु या कामाने देखील संथगतीने आपली वाटचाल सुरु ठेवली आहे. यामुळे या रस्त्याला पर्यटक अधिक नसले तरी स्थानिकांना प्रवासाचा त्रास सहन करावा लागत आहे.

कोकणाचा कॅलिफोर्निया बनवण्यासाठी शासनाचा आराखडा तयार असणारा रेवस रेड्डी सागरी महामार्ग आजही अडथळ्याची शर्यत पार करताना दिसत आहे. अनेक ठिकाणी खांद्यावरील पूल बांधणीसाठीच्या कामांना अद्यापही वेग आलेला नाही. भूसंपादन झाले पण महामार्गाच्या काम कूर्मगतीने सुरु आहे. रेवस करंजा पूल कधी होणार अशी प्रतीक्षा स्थानिकांसह पर्यटक करीत आहेत. या पुलाच्या निर्मितीने मुंबई अधिक हाकेच्या अंतरावर येणार आहे. रायगड जिल्ह्याच्या पर्यटनाचा विकास हा नेहमीच राजकीय आणि खास करून निवडणुकांमधील आश्वासनांचा मुद्दा राहिला आहे.

या आश्वसनांमध्ये आपसूकच रस्ते, पूल आणि पर्यटन क्षेत्राचा विकास हे ओघाने आलेच परंतु निवडणूक झाल्यानंतर याचा विसर लोकप्रतिनिधींना पडतो. त्याचा भुर्दंड पर्यटकांना आणि पर्यटन व्यावसायिकांना भरावा लागतो. यामुळे रायगड जिल्ह्याचा पर्यटनदृष्ट्या विकास साधायचा असेल तर जिल्ह्यातील रस्ते उत्तम दर्जाचे आणि चौपदरीकरणाचे करायला हवे. रस्त्यांचे चौपदरीकरण केल्यास येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांना मार्ग मोकळा मिळेल आणि ते सुखरूप पर्यटनस्थळी पोहचतील आणि तेथून माघारी फिरतील पण तसे होताना दिसत नाही. यामुळे पर्यटनाचा होणारा विकास निश्चितपणे खुंटला असल्याचे चित्र समोर आहे. रस्ता चौपदरीकरण करण्याकडे शासनाचा कोणताही कल दिसत नाही, केवळ रस्ता रूंदीकरणाच्या घोषणा केल्या जातात आणि प्रत्यक्षात मात्र कार्यवाही शून्य असते हा रायगडच्या जनतेला अंगवळणी पडलेला प्रकार आहे.

## लोकसंसद

### अश्विनला लक्ष्य करण्याचे कारण काय?

भारताचा माजी क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विनने एका महाविद्यालयातील कार्यक्रमात बोलताना ‘हिंदी ही राष्ट्रभाषा नाही, तर कामकाजाची अधिकृत भाषा आहे’ असे वक्तव्य केल्यानंतर समाजमाध्यमातून त्याला मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आले. विशेषतः उत्तर भारतीय आणि हिंदी भाषा समर्थकांकडून त्याला खालच्या पातळीवर जाऊन सुनावण्यात आले. खरे तर अश्विन काहीच चुकीचे बोलला नाही. त्याने वस्तुस्थितीच मांडली. कारण भारतीय राज्यघटनेने कोणत्याही भाषेला 'राष्ट्रभाषा' असा दर्जा दिलेला नाही. राज्यघटनेच्या ३४३ व्या कलमानुसार इंग्रजीसोबत हिंदी भाषेला कार्यालयीन भाषेचा दर्जा दिला आहे. तसेच राज्यघटनेने हिंदीसह २२ इतर प्रादेशिक भाषांनाही ‘अधिकृत भाषा’ म्हणून मान्यता दिली आहे. शिवाय आपल्या देशात भाषांच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्यात आल्यामुळे प्रत्येक राज्याची स्वतःची याची एक राज्यभाषा आहे. हिंदी ही भारतात सर्वाधिक बोलली जाणारी (अंदाजे ४३ टक्के) भाषा असली तरी देशातील उर्वरित ५७ टक्के लोक अहिंदी भाषिक आहेत. त्यामुळे बहुभाषीय असलेल्या आपल्या देशात कोणत्याही एका भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा देणे राज्यघटनेतील समानतेच्या तत्वाच्या विरोधात जाईल या भूमिकेतून घटनाकारांनी विचारपूर्वक कोणत्याही एका भारतीय भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा दिलेला नाही. असे असताना हिंदी भाषा समर्थकांकडून अश्विनला लक्ष्य करण्याची गरजच नव्हती.

– प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

### वाचकांचे मनोगत करिता

महाराष्ट्र पुरोगामी विचारवंतांचा, साधुसंतांचा, फुले शाहू आंबेडकरांचा, श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा म्हणून ओळखतात. बीड जिल्ह्यातील हत्या आणि खूनाचा प्रयत्न प्रकरणे पाहिल्यावर प्रश्न पडतो.बीड नक्की महाराष्ट्रात आहे की कुठल्या अन्य राज्यात. बीड जिल्हा छत्रपती संभाजी नगर विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या कार्यक्षेत्रात येतो.सन २०२० ते २०२४ दरम्यान बीड जिल्ह्यात २७५ हत्या झाल्याची आकडेवारी संकेतस्थळावरून समोर आली आहे. शिवाय बीड जिल्ह्यातील खूनाचा प्रयत्नांची ७२८ प्रकरणे विविध पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहेत. आर्थिक फसवणुकीचे अनेक गुन्हे दाखल झाल्याची नोंद आहे.बीड मधील सरपंचांची निर्घृण हत्या झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. खंडणी,अपहरण सारख्या घटना वारंवार घडत असतात परंतु,सरपंचाची निर्घृण हत्या ज्याप्रमाणे करण्यात आली. या हत्येमुळे महाराष्ट्रात हाहाकार उडाला, आरोपी पकडण्यात विलंब झाला,गुन्हेगारांवर कारवाई करण्यास दिरंगाई केली.आमदार सुरेश धस दररोज आरोपी कोण आहेत हे उघडपणे माध्यमांसमोर सांगत आहेत.

– महादेव गोळवसकर

## दिनविशेष

# भारताचे पहिले अंतराळवीर राकेश शर्मा

राकेश शर्मा यांचा जन्म १३ जानेवारी १९४९ रोजी पटियाला, भारत (सध्याचे पंजाब, भारत) येथे झाला. ते सेंट जॉर्ज ग्रामर स्कूल, हैदराबाद, निजाम कॉलेज हैदराबाद आणि ३५ व्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी आहेत. राकेश शर्मा यांना १९७० मध्ये भारतीय हवाई दलात वैमानिक म्हणून नियुक्त करण्यात आले. १९७१ च्या बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान त्यांनी मिग-२१ लढाऊ विमानातून २१ लढाऊ मोहिमे उडवली.

२० सप्टेंबर १९८२ रोजी, भारत आणि सोव्हिएत युनियन यांच्या संयुक्त उपक्रमाचा एक भाग म्हणून त्यांना अंतराळवीर म्हणून निवडण्यात आले. त्याने मॉस्कोमधील युरी गागारिन कॉस्मोनॉट ट्रेनिंग सेंटरमध्ये दोन वर्षे कठोर प्रशिक्षण घेतले आणि त्याला क्लॉस्ट्रोफोबियाने ग्रस्त आहे की नाही हे शोधण्यासाठी बंगलोरमधील खअऋ सुविधेत ७२ तास बंद खोलीत बंद केले. विंग कमांडर रवीश मल्होत्रा स्टँडबायवर होते. राकेश शर्मा यांनी सोव्हिएत रॉकेट सोयुझ टी-११ वरून अंतराळात प्रवेश केला आणि त्यामुळे अंतराळात जाणारा पहिला भारतीय ठरला. सोयुझ ढ-११ रॉकेट ३ एप्रिल १९८४ रोजी कझाक सोव्हिएत सोशलिस्ट रिपब्लिकमधील बायकोनूर कॉस्मोड्रोम येथून प्रक्षेपित करण्यात आले. याने तीन सदस्यीय सोव्हिएत-भारतीय आंतरराष्ट्रीय क्रू ज्यामध्ये स्पेसशिप कमांडर युरी मालीशेव्ह आणि फ्लाइट इंजिनियर गेनाडी स्ट्रेकालोव्ह यांचा समावेश होता, डॉक आणि हस्तांतरित केले. डरश्रीं ७ ऑर्बिटल स्टेशन.

सॅल्युट ७ स्पेस स्टेशनवर त्यांनी ७ दिवस, २१ तास आणि ४० मिनिटे घालवली. मिशनने ४३ प्रायोगिक सत्रांसह वैज्ञानिक आणि तांत्रिक अभ्यास केले, परंतु त्याला बायो-मेडिसिन आणि रिमोट-सेन्सिंगची जबाबदारी देण्यात आली. सोव्हिएत-भारतीय क्रूने मॉस्को अधिकारी आणि तत्कालीन भारतीय पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासमवेत संयुक्त दूरदर्शन वार्ताहर परिषद घेतली. अंतराळातून भारत कसा दिसतो, असे विचारले असता शर्मा म्हणाले, सारे जहाँ से अच्छा.

वर्षानुवर्षे, राकेश शर्मा हे पदावर आले आणि विंग कमांडर म्हणून निवृत्त झाले. १९८७ मध्ये, ते हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड मध्ये नाशिक येथे मुख्य चाचणी वैमानिक म्हणून रुजू झाले आणि १९९२ मध्ये बंगळुरू विभागात गेले. २००१ मध्ये त्यांनी उड्डाणातून निवृत्ती घेतली. अंतराळातून परतल्यावर शर्मा यांना हिरो ऑफ सोव्हिएत युनियनचा सन्मान बहाल करण्यात आला. हा सन्मान मिळालेले ते एकमेव भारतीय आहेत. भारताचा सर्वोच्च शांतता काळातील शौर्य पुरस्कार, अशोक चक्र, त्यांना आणि मिशनचे इतर दोन सदस्य, मालीशेव आणि स्ट्रेकालोव्ह यांनाही बहाल करण्यात आले. राकेश शर्मा एक लोकप्रिय प्रेरक वक्ता आहेत आणि त्यांनी अंतराळातील त्यांच्या अनुभवांबद्दल अनेक पुस्तके लिहिली आहेत. ते भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या गगनयानसाठी राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे सदस्य आहेत, जे भारताच्या महत्त्वाकांक्षी मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रमासाठी जबाबदार आहे.

शर्मा त्यांची पत्नी मधूसोबत तामिळनाडूतील कुन्नूर येथे साधे आणि समाधानी जीवन जगतात. ते आता लोकांच्या नजरेत नाहीत, पण गगनयानसाठी इस्रोच्या राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे सदस्य म्हणून ते भारताच्या अंतराळ कार्यक्रमात योगदान देत आहेत.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ जानेवारी

१) श्री. भास्कर विष्णू अन्जर्लेकर
गोंधळपाडा, अलिबाग
१३-०१-१९३८

२) श्रीम. शुभांगी एकनाथ पाटील
चेंढरे, अलिबाग
१३-०१-१९५०

३) श्री. आनंत रामजी घाडगे
मु.कुरूळ, रायगड
१३-०१-१९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८**
**(बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**निकिता राजेंद्र भोईलकर, आंबेपुर (मल्याण), अलिबाग**

# वाल्मीक कराड भाजपचा माणूस

## संजय राऊत यांची टिका

**| मुंबई | प्रतिनिधी |**

**वाल्मीक कराड हा भाजपचा माणूस, भाजपने छोटे मासे पकडून मोठा मासा जाळ्यात ठेवला आहे, अशी टीका शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. तसेच, वाल्मीक कराड काही दिवसांतच बाहेर येईल, असेही संजय राऊत म्हणाले आहेत.**

मुंबईत रविवारी (दि.१२) पत्रकारांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, या राज्याचे गृहमंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वारंवार एक विधान करत आहेत की आम्ही कुणालाही सोडणार नाही. परंतु, त्यांनी मुख्य आरोपीला सोडून सर्व आरोपींना मोक्का लावला आहे. भाजपची ही राज्य करण्याची पद्धत आहे. मुख्य आका पक्षात ठेवायचा आणि त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या लोकांवर कारवाई करायची. बीड आणि परभणीत जे घडलंय ते अतिशय भयानक असल्याच संजय राऊत म्हणाले आहेत.



पुढे बोलताना ते म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस न्याय करतील अशी आमची अपेक्षा होती. कारण ते वारंवार न्याय आणि सत्याची भाषा करतात. कुणालाही सोडणार नाही, खपवून घेणार नाही असे फडणवीस म्हणतात. परंतु, त्यांनी खपवून घेतलेले अनेक गुन्हेगार आणि भ्रष्टाचार लोक त्यांच्याच बाजूला बसले आहेत. वाल्मीक कराड हा त्यांच्याच पक्षाचा आहे. त्यांनी लहान मासे पकडले असून मोठा मासा जाळ्यात ठेवला आहे. हा मासा १०-१५ दिवसांत बाहेर येईल. वाल्मीक कराडवर साधा खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीडचे आमदार सुरेश धसे हे भाजपचेच आहेत. संदीप क्षीरसागर हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आहेत. हे सर्व पक्षाचे लोक आक्रोश करत आहेत. जर या राज्याचे मुख्यमंत्री ऐकत नसतील, समजून घेत नसतील तर याचा अर्थ असा आहे की तुम्हाला मुख्य आरोपींना वाचवायचे आहे. आणि तुम्ही कारवाईचे फक्त ढोंग करत आहात, असेही राऊत यावेळी म्हणाले. जे लुटले आहेत, ज्यांची फसवणूक झाली आहे, ज्यांना दहशतीने मारले आहे त्यांच्या कुटुंब हळूहळू पुढे येतील. अशा वेळी मुख्यमंत्र्यांनी या सर्वांना संरक्षण दिले पाहिजे. या उलट मुख्यमंत्री आरोपींना वाचवत आहे हे मला दुर्दैवाने म्हणावेसे वाटत आहे. एकेकेळी मुंबईतले अंडरवर्ल्डमधले लोक प्रोटेक्शन मनी घ्यायचे. आता सरकारच या लोकांकडून प्रोटेक्शन मनी घेत आहे का, हे पहावे लागेल.

> **“महाराष्ट्र शांतच आहे. विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्र स्तब्ध झाला आहे. बीड आणि परभणीमध्ये अशांतता आहे. शरद पवार तिथे जाऊन आले. आम्ही तिथे गेलो नाही कारण आम्हाला शांतता हवी आहे. आणि शरद पवारांच्या पक्षाचे नेतेच आंदोलन करून मोर्चे काढत आहेत. त्यांनी सांगायला हवे की खून विसरून जा. या राज्यात शांतता नांदायला हवी आणि त्यांच्यासोबत सहमत आहोत. मात्र, गुंडगिरीली समर्थन व वाल्मीक कराडसारख्या माणसाला संरक्षण देऊन तसेच संतोष देशमुख, सोमनाथ सुर्यवंशींचा खुन पचवून शांतता नांदणार नाही.”**
>
> **– खा. संजय राऊत**

# मुंडे भावंडांमुळे बीड बदनाम

**| मुंबई | प्रतिनिधी |**

सुरेश धस यांच्यामुळे बीड जिल्हा बदनाम झाला आहे, अशी टीका भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी केली होती. मात्र, पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे या बहीण भावांमुळे बीड बदनाम झाले आहे, अशी टीका सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे. तसेच, धस हे पण त्यातलेच एक आहेत, असेही दमानिया म्हणाल्या असहेत.

सोशल मिडीयावर पोस्ट करत दमानिया म्हणाल्या की, पंकजा मुंडे तुम्ही आज धस विरुद्ध बोलता त्याचे मी स्वागत करते. तुमच्या मतदार संघात झालेल्या इतक्या क्रूर हत्येबद्दल तुम्ही खरंतर रोज बोलायला हवे होते, त्या कुटुंबाच्या घरी जायला हवे होते, जन आक्रोश मोर्च्यात



सहभागी व्हायला हवे होते. परंतु, तुम्ही यातले काहीच केले नाहीत. बीड आपोआप बदनाम नाही झाला, तुम्हा भावाबहिणीच्या दहशतीने तो बदनाम झाला आहे. धस पण त्यातलेच एक आहेत. तसेच, पंकजा मुंडे तुम्ही बीड मधेच राहता आणि तुम्ही एक महिला देखील आहात, मात्र, तुम्ही हे विसरता की हे गुंड तुमचेच आहेत. तुम्हाला सुरक्षा आहे परंतु, सामान्य जनतेला नाही. तुमच्या गुंडांची दहशत त्या सामान्य जनतेला भोगावी लागत असल्याचे अंजली दमानिया म्हणाल्या आहेत.

# आकावरही मोक्का लावावा; आमदार धस यांची मागणी

**| बीड | प्रतिनिधी |**

सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी सात आरोपींवर मोक्का लावण्यात आला आहे. मात्र, वाल्मीक कराडवरही मोक्का लावला जावा, अशी मागणी भाजप आमदार सुरेश धस यांनी केली आहे. तसेच, परळीत अजूनही राखेच्या टिप्परची अवैध वाहतूक सुरू आहे, असा आरोपीह धस यांनी केला.

यावेळी, माध्यमांशी बोलताना सुरेश धस म्हणाले की, परळीबाबत संपूर्ण महाराष्ट्रात चर्चा सुरू असताना राखेचे टिप्पर बंद नाहीत. या राखेच्या टिप्परची अवैध वाहतूक सुरूच आहे. आणि याला परळीचे पोलीस आणि परळीचे थर्मल पॉवरचे अधिकारी, कर्मचारी जबाबदार आहेत. १४१ शेतकऱ्यांना हार्वेस्टर मशीन द्यायची होती, परंतु या लोकांनी पाच हजारहून अधिक शेतकऱ्यांकडून पैसे जमा केले आहेत. तसेच, पंढरपूरमध्ये या प्रकरणी



पहिला गुन्हा दाखल झाला आहे. असेच गुन्हे कोल्हापूर, बीड आणि पुण्यात दाखल होतील. यामध्ये आका आणि आकाचे आका दोघे सहभागी आहेत. त्यांनी कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला असून महाराष्ट्राच्या जनतेपुढे हा घोटाळा आलेला आहे. याबाबत सात आरोपींवर मोक्क लावला गेला आहे, मात्र, आकावरही मोक्का लावावा, अशी अपेक्षा असल्याचे धस म्हणाले आहेत.

## पालिका स्वबळावर लढवावी: राऊत

**| मुंबई | प्रतिनिधी |**

पत्रकार परिषदेत संजय राऊत म्हणाले की, मी इतकंच म्हणेन की, लोकसभा निवडणुकीसाठी आम्ही सर्वांनी इंडिया आघाडी बनवली. विधानसभेसाठी महाविकास आघाडी बनवली. आता स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक आहे आणि ही निवडणूक कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. सर्व कार्यकर्त्यांची इच्छा आहे की निवडणूक आपण लढवावी. जेव्हा तीन ते चार पक्ष एकत्र निवडणूक लढवतात तेव्हा कार्यकर्त्यांवर अन्याय होतो. यासाठी आम च्या पक्षाच्या कार्यकर्त्यांची भावना आहे, त्या उद्धव ठाकरे जाणून घेत आहेत असे, संजय राऊत म्हणाले.

# कराडला अटक का नाही?

## सुप्रिया सुळेंचा सरकारला प्रश्न

**| परभणी | प्रतिनिधी |**

संजय राऊत, नवाब मलिक, अनिल देशमुख यांच्यावर ईडीची नोटीस आली आणि त्यांना तातडीने अटक झाली. वाल्मीक कराडला ईडीची नोटीस येऊनही त्याच्यावर कारवाई का नाही, असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खा. सुप्रिया सुळे यांनी सरकारला विचारला आहे. दरम्यान, परभणीत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची सुप्रिया सुळे यांनी भेट घेतली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.

खा. सुळे म्हणाल्या की, वाल्मीक कराडवर मोक्का का नाही लावला? कराडला ईडीची नोटीस आली आहे. कराडवर खंडणी मागितल्याचा आरोप, हत्येचा आरोप आणि बेकायदेशी व्यवसाय करण्याचे आरोप आहेत. कराडवर कुठल्याही राजकीय केसेस नाहीत. वाल्मीक कराडने अवदा कंपनीच्या अधिकाऱ्याचे अपहरण केले होते. अशी केस मे महिन्यात दाखल झाली होती. या केसमध्ये आणि ईडीच्या केसमध्ये कराडचे नाव पहिल्या क्रमांकावर



आहे. तसेच, मला एकच प्रश्न सरकारला विचारायचा आहे की संजय राऊत, नवाब मलिक, अनिल देशमुख यांच्यावर ईडीची नोटीस आली आणि त्यांना तातडीने अटक झाली. या सगळ्यांवर केसेस चालल्या. मग वाल्मीक कराडमध्ये काय विशेष आहे की, कराडकडे कुणाबद्दल माहिती आहे की त्याला विशेष वागणूक दिली जाते? हा सगळ्यांच्याच मनातला प्रश्न आहे. वाल्मीक कराडकडे अशी काय माहिती आहे की त्याच्या विरोधात सरकार कडक कारवाई करत नाही? याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल, असेही सुप्रीया सुळे म्हणाल्या आहेत.

## भंगारच्या गोदामाला भीषण आग

**| कल्याण | प्रतिनिधी |**

ठोण जिल्ह्यातील भिवंडीतील एका भंगारच्या गोदामाला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत आसपासची सहा ते सात दुकाने जळून खाक झाली असल्याची माहिती समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भिवंडीतील खंडुपाडा परिसरात रविवारी पहाटे ४.३० ते ५ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. आगीची माहिती मिळताच अग्नीशमन दलाच्या तीन गाड्या आणि स्थानिक पोलीस घटनासथळी दाखल झाले होते. दरम्यान, अग्नीशमन दलाकडून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू होते. या भंगार गोदामात ज्वलनशील पदार्थ असल्यामुळे आजूबाजूच्या दुकानांमध्ये ही आग पसरली होती. त्यात फर्निचर गोदाम व गॅरेजसह सहा ते सात दुकाने जळून खाक झाली आहेत. ही आग विझवण्यासाठी स्थानिक नागरिकही अग्नीशमन दलाच्या मदतीसाठी धावले होते.

# मुंबई-चेन्नई एक्सप्रेसवर दगडफेक

**| सोलापूर | प्रतिनिधी |**

वंदे भारतनंतर सोलापुरात मुंबई-चेन्नई एक्सप्रेसवर दगडफेक करण्यात आली आहे. पारेवाडी आणि वाशिंबे दरम्यान ही घटना घडली असून गेल्या १० दिवसांतील दुसरी घटना आहे. यात अपंग डब्यातील एका प्रवाशाला किरकोळ दुखापत झाली आहे. त्याच्यावर त्वरीत उपचार करण्यात आले असून अन्य कोणी जखमी झाल्याची माहिती मिळालेली नाही.

या दगडफेकीमुळे ट्रेनच्या खिडक्या तुटल्या असून या घटनेचा व्हिडिओ समोर



आला आहे. व्हिडिओमध्ये खिडक्यांच्या काचेचे तुकडे झाल्याचे दिसत आहे. या प्रकरणी सोलापूर रेल्वे पोलिसांनी अज्ञात लोकांविरुद्ध गुन्हा दाखल करत तपास सुरू केला आहे.

गेल्या १० दिवसांत दुसऱ्यांदा अशा प्रकारची घटना घडल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याआधी वंदे भारत एक्सप्रेसवर दगडफेक करण्यात आली होती. ट्रेनच्या सी-११ कोचला लक्ष्य करण्यात आले होते. वंदे भारत नंतर हल्लेखोरांनी मुंबई-चेन्नई एक्सप्रेसला लक्ष्य करत दगडफेक केली आहे.

# खालापूरातील पत्रकारांचा सन्मान



**| खोपोली | प्रतिनिधी |**

कर्जत-खालापूर मतदारसंघातील विविध प्रश्नावर आवाज उठवणे, सामाजिक कार्याला प्रसिद्धी देऊन योग्य न्याय देण्याचे काम पत्रकार अखंडितपणे करत असतात. जनता आणि लोकशाहीमधील दुवा म्हणून पत्रकारांकडे बघितले जाते, म्हणून पत्रकार दिनाचे औचित्य साधत रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी शहर आणि तालुक्यातील पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात केला आहे. सुधाकर घारे यांच्या जनसंपर्क कार्यालयात पत्रकारांचा सन्मान सोहळा पार पडला.

यावेळी, माजी जि.प.सभापती अशोक भोपतराव, एकनाथ धुळे, ज्येष्ठ पत्रकार भाई ओव्हाळ, विजय मांडे, खालापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष राहुल देशमुख, राकेश खराडे, बळीराम देशमुख आदी उपस्थित होते.



# मेळाव्यातून सामाजिक सलोख्याचा संदेश

**| कोर्लई | वार्ताहर |**

म्हसळा येथे जे.एम.एम. एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नाझीम चोगले यांच्या अध्यक्षतेखाली शांती संमेलन व बंधुता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. हा मेळावा शांतता आणि सामाजिक ऐक्याचा आदर्श घालून देणारा ठरला.

समाजातील शांतता व एकता टिकवण्यासाठी असे कार्यक्रम अनिवार्य असून यातून लोकांमध्ये सामंजस्य व सकारात्मक दृष्टिकोन वाढतो, असे डीवायएसपी सविता गडगे यांनी आपले विचार मांडताना सांगितले. यावेळी पोलिस निरीक्षक संदीप कहाले यांनी देखील आपले विचार मांडले. तर, प्रमुख वक्ते जनाब कलीम मोहम्मदी , जनाब अब्दुल मुईद मदनी आणि दिगंबर टेकले यांनी यावेळी शांततेचा संदेश देत सामाजिक सलोख्याचे महत्त्व स्पष्ट करून समाजातील समस्या सोडवण्यासाठी सकारात्मक



विचारांच्या देवाणघेवाणीवर भर दिला.

यावेळी डी.वाय.एस.पी सविता गडगे, पोलीस निरीक्षक संदीप कहाले, हिंदू समाज तालुका अध्यक्ष समीर बनकर, पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबू शिर्के, बौद्ध समाज अध्यक्ष करण गायकवाड, कोळी समाज अध्यक्ष अनिल बसवत, प्राचार्य दिगंबर टेकले, कुंभार समाज अध्यक्ष सुरेश कुडेकर, शिवसेना (उद्धव ठाकरे) जिल्हाध्यक्ष नंदू शिर्के, महेश पवार, सुशील यादव, अनंत नाक्ती, किरण पालांडे, महेश घुले, सुधाकर येलवे, संदीप चाचले, नंदु गोविलकर, सुनील शेडगे मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अंजुमन कॉलेजची दमदार कामगिरी

**| रोहा | वार्ताहर |**

श्रीवर्धन तालुक्यातील गोखले इंग्लिश स्कुल येथे विज्ञान प्रदर्शन निमित्ताने तालुकास्तरीय विविध स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेत अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कुल अँड ज्युनियर कॉलेजने विविध स्पर्धेत चमकदार कामगिरी करून सात पारितोषिक मिळविले आहेत.

तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कुल व ज्युनियर कॉलेजमधील विद्यार्थ्यांमधील हमना अराई हिने प्रथम क्रमांक, तर अनम मलबारी हिने तिसरा क्रमांक पटकविला आहे. वक्तृत्व स्पर्धेत सोएब दरवेश, आफिफा सय्यद या दोघांनी द्वितीय



क्रमांक पटकवीला आहे. सायन्स मॉडेल स्पर्धेत अनम मलबारी हि प्रथम क्रमांकांची मानकरी ठरली आहे. तर, अ. रहिमान शेख आणि मुनीब चोगले यांनी द्वितीय क्रमांक पटकविला आहे. शिक्षक मॉडेल स्पर्धेत शेख मोहम्मद इलियास यांनी प्रथम क्रमांक पटकविला आहे. स्पर्धेत बक्षीसपात्र ठरलेले विद्यार्थी व शिक्षकांचे शाळेचे अध्यक्ष डॉ. अबू राऊत, नजीर आली राऊत, अकील बगदादी, फैसल हर्जूक, खलील अराई, फवाद अराई, मुख्याध्यापक नजीउल्ला खान व ग्रामस्थवर्गातून अभिनंदन होत आहे.

## गुणवंत कामगारांच्या नियुक्तीची मागणी

**| अलिबाग | वार्ताहर |**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे मंडळाच्या नोंदीत समाजामध्ये व आस्थापनेमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कामगारांना प्रोत्साहन देण्यासाठी ‘गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार’ प्रदान करण्यात येतो. या गुणवंत कामगारांची राज्यातील विविध महामंडळे, जिल्हा व स्थानिक तालुका पातळीवरील शासकीय कमिटी तसेच समित्यांवरती नियुक्ती करावी, अशी मागणी राज्य गुणवंत कामगार असो.च्यावतीने राज्य सरकारकडे करण्यात आलेली आहे.

पुरस्कार प्राप्त कामगार विविध संस्था तसेच संघटनांच्या मध्यातून समाजातील सर्व घटकांसाठी अविरतपणे कार्य करीत असतात. शासनाने देखील त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन, जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत त्यांना वयाच्या ७० वर्षापर्यंत विशेष कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे. गुणवंत कामगारांच्या वैशिष्ट्यपूर्ण तसेच उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन सिमित्यांवर नियुक्ती करावी, जेणेकरून त्यांच्या अनुभवाचा लाभ संबंधित समितीला होऊ शकतो. पर्यायाने सरकारला देखील होऊ शकतो. याबाबतचे लेखी निवेदन राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामगार मंत्री तसेच मुख्य सचिवांना पाठविले असल्याचे असो.चे अध्यक्ष केसरकर यांनी सांगितले आहे.

### बंदुकीच्या दस्त्याने डोके फोडून लूट | लाखोंचे दागिने घेऊन हल्लेखोर पसार

# वसईत ज्वेलर्स दुकानात सशस्त्र दरोडा

**| पालघर | वार्ताहर |**

अग्रवाल सिटी येथील मयंक ज्वेलर्सवर शुक्रवारी (दि.१०) रात्री सशस्त्र दरोडा पडला. दरोडेखोरांनी दुकानात घुसून बंदुकीच्या दस्त्याने सराफाचे डोके फोडले. त्यानंतर त्याला एका खोलीत डांबून ठेवत हाताला लागतील तेवढे लाखो रुपयांचे दागिने घेऊन दुचाकीवरून धूम ठोकली. हा सर्व प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला असून व्यापाऱ्यांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. दरम्यान, माणिकपूर पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेत दरोडेखोरांच्या मागावर पथके रवाना केली आहेत.



बाभोळा येथील अग्रवाल दोशी कॉम्प्लेक्समध्ये मयंक ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. या दुकानात मालक रतनलाल संघवी (६७) आणि त्यांचा मुलगा मनीष संघवी हे असतात. शुक्रवारी मनीष संघवी कामानिमित्त बाहेर गेला होता. रात्री सवानऊच्या सुमारास रतनलाल दुकान बंद करण्याच्या तयारीत होते. ते दागिन्यांचे ट्रे कपाटात ठेवत होते. त्याचवेळी तोंडाला मास्क आणि हेल्मेट घालून दोन हल्लेखोर दुकानात शिरले. आत शिरताच चोरट्यांनी बंदुकीने संघवी यांच्यावर हल्ला केला. यात रतनलाल गंभीर जखमी झाले.

### रेकी केल्याचा संशय

**हल्लेखोर अचानक दुकानात शिरले आणि त्यांनी बंदुकीने संघवी यांना मारहाण करत दुकान लुटले, अशी माहिती पोलीस उपायुक्त पूर्णिमा चौगुले-श्रींगी यांनी दिली. यात आणखी आरोपींचा समावेश आहे का, याचा तपास सहा पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकांमार्फत सुरू आहे, असेही त्यांनी सांगितले. हल्ल्यापूर्वी दरोडेखोरांनी रेकी केली असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.**

त्यानंतर त्यांना एका खोलीत डांबून लाखोंचे दागिने घेऊन दरोडेखोर पसार झाले. दरोडेखोरांनी हेल्मेट आणि तोंडाला रुमाल बांधले होते.

या घटनेने खळबळ उडाली असून व्यापाऱ्यांनी परिसरात पोलीस चौकी उभारावी, अशी मागणी केली आहे.

# निवडक



## पुस्तक वाचनावर व्याख्यान

**माणगाव :** माणगाव येथील जे.बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलजमध्ये शनिवारी (दि.११) 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत पुस्तक वाचनाचे महत्व या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी ११० विद्यार्थी उपस्थित होते. प्रत्येक विद्यार्थ्याने दर आठवड्याला किमान एक पुस्तक वाचले पाहिजे, असे आवाहन रामजी कदम यांनी केले. तर, ग्रंथपाल अमित बाकाडे यांनी पुस्तक वाचनाची गोडी लागावी म्हणून आपल्या समोर जे लेखक साहित्य उपलब्ध असेल ते वाचावे, म्हणजे आपोआप आपल्याला त्याची सवय होईल, असे मत मांडले. यावेळी पुस्तक परीक्षण व पुस्तक अभिवाचन स्पर्धेत प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी, प्रा. हर्षल जोशी, प्रा. अशोक मोरे, ग्रंथपाल अमित बाकाडे, प्रा. डॉ. जगदीश शिगवण, प्रा.डॉ. नितीन मुटकुळे, प्रा.भारत पवार व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होती.



## हिंदु संघटनेच्यावतीने मेळावा

**म्हसळा :** म्हसळा तालुका हिंदू संघटनेच्यावतीने हिंदु धर्म जागरण मेळाव्याचे आयोजन शनिवारी (दि.११) करण्यात आले होते. या मेळाव्यात म्हसळा तालुक्यातुन तसेच जिल्हातुन हजारोंच्या संख्येने हिंदु जन सागर लोटला होता. यावेळी, म्हसळा नगरी अगदी भगवामय झाली होती. दरम्यान, सकाळच्या सुमारास धाविर देव महाराज प्रांगणातुन जय श्री राम जयघोषात व पांडुरंगाच्या गजरात धाविर देव महाराज प्रांगणातुन दिंडी काढण्यात आली होती. या दिंडी सोबत रथामध्ये शिरीष महाराज यांना बसवून मिरवणुक काढण्यात आली होती. या सोहळ्यात तरुण, ग्रामस्थ, महिला, लहान मुलं, अबाल वृद्ध सहभागी होऊन हरिनामाचा गजर करीत दिंडी पुढे सरकत होती. या मेळाव्याचे आयोजन न्यु इंग्लिश स्कुल पटांगणात करण्यात आले होते.



## तळा तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान

**तळा :** दर्पणकार स्व. बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त व पत्रकार दिनाचे औचित्य साधून तळे विभाग शिक्षणप्रसारक मंडळाच्यावतीने तालुक्यातील सर्व पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष पुरूषोत्तम मुळे, सचिव मंगेशशेठ देशमुख, शाळा समितीचे चेअरमन महेंद्रशेठ कजबजे, मुख्याध्यापक दिलीप ढाकणे व तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार पुरूषोत्तम मुळे, कृष्णा भोसले, किशोर पितळे, विराज टिळक, संजय रिकामे, डी.टी. आंबेगावे, श्रीकांत नांदगावकर, संध्या पिंगळे-ठाकूर, देवयानी मोरे, नितीन लोखंडे, सुरेंद्र शेलार, नजीर पठाण आदी पत्रकारांचा यथोचित सत्कार करण्यात आला.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- जमिनीची खरेदी व विक्री अलिबाग परिसरात NA. Plat उपलब्ध बुरुमखान, भुते, खडताळपुल, एरियामध्ये जागा उपलब्ध. सहाण, खानाव, भादाणेमध्ये जागा उपलब्ध. ऑफीस सन स्टोन रीयल इस्टेट अलिबाग, साईना कॉम्प्लेक्स, बायपास रोड ८६६९००६९०२,९२७०८८८८०३
- Vacancy for Office staff in Alibag Interested Graduate candidates can call 9923750549 For interview
- अलिबाग येथे वाडीमध्ये कामासाठी माणूस पाहिजे. राहण्याची सोय होईल. पगार १०,०००/- मो. नं.९८२००२९४५८.
- ST स्टॅन्ड च्या शेजारी वासुदेव कॉम्प्लेक्स या इमारतीत पहिल्या मजल्यावर ७०० sqft. road touch व्यापारी गाळा भाड्याने देण्याचा आहे. फोन no. 9271432026, 7387516945
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी १२ वी पास/नापास पगार -१२०००/- रुपये महिना, १२ तास ड्युटी ठिकाण-बामणसुरे, चोंढी,संपर्क- ९८२३५८५३२१
- दुकान गाळा भाड्याने मिळेल ९४२३३७५१९८/८४११०१६४४४
- २ BHK प्रशस्त फ्लॅट विकणे आहे. ठिकाण : अलिबाग, ४ व्हिलर पार्किंग, २ लिफ्टस्, इमारतीचे उत्तम दर्जाचे बांधकाम, शाळा, कॉलेज, मच्छीमार्केट, भाजीमार्केट, हॉस्पिटल मंदिर, बँक यापासून अगदी जवळ. रक्कम ७५ लाख (कमी होतील.) मो. ९६७३९४८६३९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


### नगरपंचायतीचे दुर्लक्ष; लहानग्यांचा हिरमोड

# पालीतील एकमेव बालोद्यानाची दुरवस्था

**| सुधागड-पाली | वार्ताहर |**

**तीन वर्षापूर्वी पालीत बांधण्यात आलेल्या एकमेव बालोद्यानाची प्रचंड दुरावस्था झाली आहे. सद्यस्थितीत हे बालोद्यान अखेरची घटका मोजत आहे. मुलांना खेळण्यासाठी उद्यानेच उपलब्ध नसल्याने त्यांचा देखील हिरमोड होत आहे. त्यामुळे, अनेक नागरिकांनी याबाबत संताप व्यक्त केला आहे.**



संघर्ष ग्रुप आणि तत्कालीन पाली ग्रामपंचायतीमार्फत लहान मुलांची गरज ओळखून येथील राम आळीमध्ये पालीतील एकमेव बालोद्यान बनविण्यात आले होते. त्यानंतर पाली ग्राम पंचायतीचे रूपांतर नगरपंचायतीमध्ये होण्याची प्रक्रिया सुरू झाली आणि नगरपंचायतीवर प्रसासकांची नेमणूक झाली. दरम्यानच्या काळात उद्यानाकडे दुर्लक्ष झाले. मात्र, नगरपंचायत होऊन अडीच ते तीन वर्षे झाली असुन वारंवार नगरपंचायतीकडे या बाल उद्यानाबाबत दुरुस्ती करण्यात यावी, यासाठी तक्रार करण्यात आली. मात्र, नगरपंचायतीकडून कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही.

पाली नगरपंचायत झाल्यावर पालीकरांना वाटले की, यावेळी या बलोद्यानाला नवी झळाळी येईल. मात्र, हे बालोद्यान जैसे थेच आहे. येथील पाळणे, सी-सॉ, गेट व बाकडे तुटली आहेत. तारेचे कुंपण अनेक ठिकाणी मोडले आहे. त्यामुळे येथे गुरांचे वास्तव्य असते. येथील झाडे व गवत कोमेजून गेली आहेत. फरशांची दुरावस्था झाली आहे. आजूबाजूला वाहने पार्क केलेली असतात. परिणामी लहानग्यांना खेळण्यासाठी हक्काचे ठिकाण नसल्याने त्यांचा प्रचंड हिरमोड होत आहे.

> **संघर्ष ग्रुप आणि तत्कालीन ग्रामपंचायतीने मिळून केलेल्या उद्यानाकडे नगरपंचायतीचे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे लहानग्यांना खेळण्यासाठी हक्काची जागा नाही. नगरपंचायतने उद्यानाची चांगल्या प्रकारे दुरुस्ती करावी. याबाबत अनेक वेळा नगरपंचायतीकडे तक्रार देऊन देखील नगरपंचायत अध्यापिक कोणता उपयोजना केलेल्या नाहीत. काही दिवसांनी हे उद्यान नाहीसे होईल. तसेच, त्या जागेवर अतिक्रमण होण्याची वाट नगरपंचायत पाहते का?**
> **- अमित निंबाळकर, माजी ग्रामपंचायत सदस्य, पाली**

## उसरोलीत रक्तदान शिबिराचे आयोजन

**| कोर्लई | वार्ताहर |**

जगद्गुरु नरेंद्र महाराज नाणीज धामकडून दरवर्षी रक्तदान महायज्ञाचे आयोजन केले जाते. त्याच धर्तीवर याही वर्षी दि.४ ते दि. १९ जानेवारी या कालावधीत रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यातच, जगद्गुरु नरेंद्र महाराज नाणीज धाम तर्फे मुरुड तालुक्यातील उसरोली फाटा येथील आगरी समाजाच्या सभागृहात रक्तदान महायज्ञ शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रमेश दिवेकर यांच्या हस्ते व मनीष नांदगावकर यांच्यासह प्रमुख मान्यवरांचा उपस्थितित रक्तदान महायज्ञ शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी, संप्रदाय तालुका अध्यक्ष अंकुश वाडकर, जिल्हा महिला अध्यक्षा अंजली जगताप, तालुका महिला अध्यक्षा प्राची पाटील, ब्लड कॅम्प पी.आर.ओ. संतोष चोरघे, सुधीर पुलेकर, अनंता भगत, किशोर भगत, तालुका सचिव जितेंद्र पाटील, सर्व संग्राम सैनिक यावेळी उपस्थित होते.

# गोखले महाविद्यालयाचे विज्ञान प्रदर्शन

**| बोर्लीपंचतन | वार्ताहर |**

श्रीवर्धन तालुका पंचायत समिती आणि गोखले शिक्षण संस्था संचलित न्यु मॉर्डन इंग्लिश मीडियम स्कूल आराठी यांच्या संयुक्त विद्यमाने ५२ व्या श्रीवर्धन तालुका विज्ञान प्रदर्शनचा बक्षिस वितरण समारंभ गुरुवारी (दि.९) संपन्न झाला. यावेळी, विज्ञान प्रदर्शनाचा मुख्य विषय 'शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान' हा होता. हे प्रदर्शन प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली, गट शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, पंचायत समिती यांच्या अध्यक्षतेखाली व प्रा. किशोर लहारे, मुख्याध्यापिका वैशाली सावंत यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाले.




या विज्ञान प्रदर्शनाला श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या डी. वाय.एस.पी. सविता गर्जे यांनी आवर्जून उपस्थिती लावली होती. त्यांनी सर्व विज्ञान प्रकल्पांची पाहणी करुन प्रदर्शनात सहभागी विद्यार्थांशी संवाद साधत स्पर्धकांचे कौतुक केले. यावेळी बोलताना रमेश चव्हाण यांनी आयोजकांना धन्यवाद देत सहभागी विद्यार्थी, विज्ञान व शाळा शिक्षक, केंद्रप्रमुख, गणित अध्यापक मंडळ आणि स्पर्धापरिक्षक या सर्वांचे कौतुक केले. तसेच, परिक्षक, शिक्षक आणि स्पर्धक विद्यार्थ्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नवज्योत जावळेकर यांनी केले. तर, शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली सावंत यांनी बक्षिस वितरण कार्यक्रमाला आलेल्या सर्व मान्यवर, अतिथी व प्रदर्शनात सहभागी विज्ञान शिक्षक, विद्यार्थी, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी या सर्वांचे आभार मानले.

## गायमुख शाळेला सुवर्णकाळ प्राप्त

**| तळा | वार्ताहर |**

तळा-उसर येथील अभिनव ज्ञान मंदिरात दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शन पार पडले. या प्रदर्शनात रायगड जिल्हा परिषद गायमुख शाळेची विद्यार्थिनी प्रिया गिरी हिने वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तसेच, वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगचा धोका पाहता सौरऊर्जेवर आधारित प्रतिकृतीची सुबक मांडणी शाळेतील विद्यार्थ्यांकडून करण्यात आली होती.

तळा तालुक्यातील रा.जि.प. गायमुख शाळा ही उत्तरोत्तर प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. मागील दोन वर्षात शाळेने विविध प्रकारे स्पर्धेत यश संपादन केले आहे.



विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे ध्येय उराशी बाळगून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, पालक मुख्याध्यापक, शिक्षक हे विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षणाबरोबरच मंथन, शिष्यवृत्ती, नवोदय परीक्षा तसेच इतर उपक्रमात सहभाग देऊन त्यासाठी रात्रंदिवस मेहनत घेत आहेत. त्यामुळे गायमुख शाळेला सुवर्णकाळ प्राप्त झाला असून आदर्श शाळा म्हणून तिच्याकडे पाहिले जात आहे.

## सहकारी संस्थांमुळे व्यवसायांना चालना: हरलय्या

**| हमरापूर | प्रतिनिधी |**

सहकारी संस्थांमुळे छोट्या व्यवसायांना चालना मिळते, असे उद्गार रायगड जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक हरलय्या यांनी काढले आहेत. पेण तालुक्यातील हमरापुर येथे श्री सिद्धिविनायक हमरापुर विभाग औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित या संस्थेच्या प्रथम वर्धापन दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यावेळी ते बोलत होते.



पुढे बोलताना हरलय्या यांनी औद्योगिक संस्थेला मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून बँक ऑफ इंडियाचे उप विभागीय प्रबंधक विजय कुमार कुलकर्णी तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक हरलय्या, अशोक मोकल, अभय म्हात्रे, जयेश पाटील, कृष्णा गोलीमडे, संदेश कदम, श्रीराम ठाकूर, नशिकांत गायकवाड, विनोद नाईक, मितेश पाटील, राजेश पाटील आदी उपस्थित होते.

## अंजुमन महाविद्यालयात आरोग्य शिबीर

**| कोर्लई | वार्ताहर |**

मुरुडचे अंजुमन महाविद्यालय आणि पनवेलचे आर. झुनझुनवाला शंकरा नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.११) अंजुमन महाविद्यालयाच्या सभागृहात मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, मुरुड परिसरातील सुमारे १२० जणांनी या शिबिराचा लाभ घेतला आहे.

या शिबिरात रुग्णांना स्वस्त दरात चष्मे देण्यात आले. महाविद्यालयाचे अध्यक्ष जैनुद्दीन कादिरी आणि प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विशेषकरून या शिबिरात रस्ता



सुरक्षा अभियान निमित्त स्कूल व्हॅन, मिनीडोर व ऑटोरिक्षा चालक तसेच पोलीस कर्मचाऱ्यांचे हि नेत्रतपासणी करण्यात आली. या शिबिरादरम्यान अल्ताफ मलिक, इम्रान मलिक, इस्माईल शेख, तौसिफ़ फत्ते, जिल्हा वाहतूक शाखेचे सहाय्यक फौजदार संतोष गायकवाड, सहाय्यक फौजदार महेंद्र खोत, पोलिस हवालदार प्रशांत म्हात्रे, किशोर पठारे आणि मंगेश कावजी उपस्थित होते.

## वेश्वीत विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**| पनवेल | प्रतिनिधी |**

उरणमधील जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या पदाजी पांडुरंग मुंबईकर इंग्रजी माध्यमिक वेश्वी शाळेत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे विज्ञानाचे प्रात्यक्षिक सादरीकरण केले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ममता प्रीतम म्हात्रे, सुनिता पाटील, प्राचार्य गणेश ठाकूर, शाळा कमिटी चेअरमन चंद्रकांत मुंबईकर हे उपस्थित होते. यावेळी, बोलताना ममता म्हात्रे म्हणाल्या की, शिक्षण घेत असतानाच आपल्या



मनातील काही वैज्ञानिक कल्पना मांडण्यासाठी विज्ञान प्रदर्शन हे एक चांगले व्यासपीठ आहे. आजचे छोटे विद्यार्थी सुद्धा आपल्या कल्पना प्रभावीपणे या प्रदर्शनात मांडताना पाहून आम्ही देत असलेल्या आमच्या शैक्षणिक सेवा कार्याबद्दल अभिमान वाटला, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

# तंत्रशास्त्र विद्यापिठात आविष्कार स्पर्धेचे आयोजन

**| माणगांव | प्रतिनिधी |**

विद्यापीठाचे कुलपती यांच्या कार्यालयामार्फत महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ अविष्कार स्पर्धेचे आयोजन लोणेरे येथील डॉ. बाबासाहे आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात दि.१२ ते १५ जानेवारी दरम्यान करण्यात येणार आहे. तसेच, आविष्कार ही राज्यव्यापी आंतर-विद्यापीठ संशोधनावर आधारित स्पर्धा असून या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील एकूण २६ विद्यापीठांचा समावेश आहे, अशी माहिती लोणेरे विद्यापीठात शनिवारी (दि.११) घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत



बोलताना कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांनी दिली आहे.

ही स्पर्धा मानवता माषा आणि ललितकथा, वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा, शुष्ट विज्ञान अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, औषधे आणि फार्मसी, कृषी आणि पशुसंवर्धन अशा सहा विविध श्रेणीमध्ये आयोजित करण्यात आली आहे. आविष्कार या स्पर्धेसाठी राज्यपाल कार्यालय, राजभवन यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षण समितीच्या मार्गदर्शनाखाली दहा निरीक्षक निवडलेले असतात तसेच राष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञ, संशोधक व इतर मान्यवर यांचा परीक्षक म्हणून सहभाग असतो. विद्यापीठाचे कुलगुरु कर्नल प्राध्यापक डॉ. कारभारी काळे यांच्या मार्गदर्शनानुसार व निर्देशानुसार आविष्कार या स्पर्धेचीयशस्वी आयोजनाचीतयारी सुरु आहे.

### तरुणांना गड संवर्धनाचा ध्यास | हजारो झाडांची लागवड

# किल्ल्यांचे जतन, पर्यावरणाचे रक्षण

**| सुधागड-पाली | वार्ताहर |**

रायगड जिल्हाला महत्वपूर्ण ऐतिहासिक वारसा व विस्तृत आणि समृद्ध निसर्ग लाभला आहे. हा वारसा जोपसण्यासाठी जिल्ह्यातील तरुण गड संवर्धन व निसर्ग संवर्धनासाठी ठोस पावले उचलत आहेत. या तरुणांच्या समर्पणामुळे व ध्यासामुळे येथील गडकिल्यांचे जतन आणि पर्यावरण रक्षणाला उभारी मिळत आहेत. विविध संस्था देखील यासाठी पुढाकार घेत असून यामध्ये बहुतांश तरुणांचा समावेश आहे. तरुणांनी अशा विधायक कार्यात स्वतः ला झोकून देणे ही बाब अतिशय उल्लेखनीय आहे.



येथील तरुणांनी निसर्ग संरक्षणासाठी विशेष अभियान सुरू केले आहेत. दरम्यान, वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन कार्यक्रम घेतले जात आहेत. आतापर्यंत हजारो झाडांची लागवड केली असून, त्यांची नियमित काळजी देखील घेतली जात आहे. निसर्गसंवर्धन मोहिमांमुळे येथील निसर्ग अधिक समृद्ध होत असून जैवविविधता बहरत आहे. मोकळ्या वेळेत तरुण निसर्गात एकरूप होतांना दिसत आहेत.

> **फक्त झाडे लावणे पुरेसे नाही. ती जगवण्यासाठी देखभाल करणे तितकेच महत्त्वाचे आहे. आम्ही लावलेल्या झाडांची तपासणी करून त्यांना पाणी व खत देता, आजूबाजूचे गवत साफ करतो. शिवाय गडसंवर्धन मोहिमा राबवितो. तरुण व ग्रामस्थांना निसर्ग व गडकिल्ल्यांचे महत्त्व पटवून देतो व त्यांचे प्रबोधन करतो. गडांवर गेल्यावर स्वच्छता आणि शिस्त पाहून आम्हाला अभिमान वाटतो. तरुणांसाठी हे उपक्रम खरोखर प्रेरणादायी आहेत.**
> **- केतन म्हसके, उपाध्यक्ष, शिवऋण प्रतिष्ठान महाराष्ट्र**

### संवर्धनामुळे किल्ल्यांचे विशेषत्व अबाधित

**दुर्गवीर प्रतिष्ठान, सह्याद्री प्रतिष्ठान, शिवऋण प्रतिष्ठान आदी अनेक संस्था गेल्या अनेक वर्षांपासून येथील गड-किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी कार्यरत आहेत. या मंडळातील सदस्य, गट तसेच अनेक तरुण स्वस्फूर्तीने येथील गडकिल्यांवर स्वच्छता व संवर्धन मोहीम राबवत आहेत. जिल्ह्यात रायगड, कुलाबा, खांदेरी-उंदेरी, मुरुड जंजिरा, कर्नाळा, सरसगड, सागरगड, मानगड, तळगड, सुधागड आदी विविध किल्ले आहेत. शिवाय अनेक दुर्लक्षित गड देखील आहेत. या गडकिल्यांवर संवर्धन व स्वच्छता मोहिमा राबविल्या जात असल्यामुळे या किल्ल्यांचे विशेषत्व अबाधित आहे.**

आपल्या आजूबाजूचा निसर्ग कसा संपन्न होईल, यासाठी तरुण पुढाकार घेत आहेत. विशेष म्हणजे गाव पातळीवर देखील तरुण पुढे येत आहेत. तरुणांच्या या उपक्रमांमुळे केवळ गडांचे सौंदर्य टिकून राहत नाही, तर गड संवर्धन व पर्यावरण रक्षणाचा महत्त्वाचा संदेशही दिला जातो. प्लास्टिकमुक्त मोहिम, जलसंवर्धनासाठी पाणथळ जागांचे संरक्षण आणि कचरा व्यवस्थापनाचे धडे आदी उपक्रम यासोबत राबवले जात आहेत.

# पांढऱ्या माशीच्या प्रादुर्भावाने बागायतदार चिंतेत

## नारळ-सुपारीच्या उत्पादनात घट; शासनाकडून अनुदानाची मागणी

| मुरूड | वार्ताहर |

निसर्गसान्निध्य लाभलेल्या कोकणात नारळ व सुपारीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते, मात्र यंदा पांढऱ्या माशीच्या प्रादुर्भावाने सुपारीसह नारळाच्या उत्पादनात लक्षणीय घट झाल्याने बागायतदारांची चिंता वाढली आहे. चक्रीवादळामुळे आधीच मुरूड, दिवेआगर व श्रीवर्धन येथील सुपारी व नारळाच्या बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या अस्मानी संकटातून शेतकरी सावरला असताना, आता पांढऱ्या माशीच्या प्रादुर्भावाने लागवड क्षेत्र कमालीचे घटले आहे. स्थानिक बागायतदार आर्थिकदृष्ट्या चिंतेत असून, पुनर्लागवड क्षेत्र वाढीस लागण्यासाठी प्रोत्साहन म्हणून भरीव शासन अनुदान मिळावे, अशी मागणी शेतकरीवर्ग करीत आहे.

मुरूड तालुक्यातील एकूण बागायत क्षेत्रांपैकी ४३५ हेक्टर क्षेत्रावर नारळ-सुपारी पिकांची लागवड करण्यात येते. त्यापैकी ४१६ हेक्टरवर नारळ-सुपारीची लागवड करण्यात आली असून, श्रीवर्धन रोठा ब्रँडच्या सुपारीला मोठी मागणी असते. या सुपारीचा दर्जा उत्तम असल्याने देश-विदेशात त्याची मोठ्या प्रमाणात विक्री होते. मुरूड तालुक्यासह नांदगाव, मजगाव, आगरदांडा, मांडला, भोईघर, सर्वे-चिकणी, काशिद, बोर्ली, दांडा व अन्य अनेक गावांमधून नारळाचे उत्पादन घेतले जाते, मात्र २०२० मध्ये निसर्ग चक्रीवादळात तालुक्यातील ७७ हेक्टर क्षेत्र बाधित झाल्यामुळे फळे देणारी कित्येक माडाची झाडे अक्षरशः जमीनदोस्त झाल्याने बागायतदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

बागायतमधील विहिरींमध्ये पाणी मुबलक असले तरी क्षाराच्या वाढलेल्या प्रमाणामुळे फळांना गळती सुरू झाली आहे, याशिवाय नारळाच्या झाडांना विविध रोगांनी ग्रासले आहे. यात उभ्या झाडाचा कोवळा कोंब कुजून त्यात अळ्या पडणे, झाडांच्या पानांवर करपा रोग पडून झाप करपणे, झापावर मर रोग पडणे, गेंड्या भुंग्याने झाडचा गर शोषून घेणे, पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव वाढल्याने झाडांच्या पानांवर पांढरी बुरशी दिसून येणे, आदी रोगांमुळे झाडांचे अन्नरस तयार होण्याचे प्रमाण कमी होते.

चक्राकार पांढरी माशी सतत रस शोषून घेते, तसेच तिच्या शरीरातून चिकट द्रव बाहेर पडत असल्याने काळी बुरशी वाढते. परिणामी अन्न प्रकियेत अडथळा निर्माण होतो व माडाची वाढ व उत्पन्न कमी होते. त्यामुळे यंदा पांढऱ्या माशीच्या प्रादुर्भावाने अनेक नारळावर डाग पडणे, तसेच खोडावर परिणाम होत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. शिवाय रोगाचा प्रादुर्भाव खोडावर होत आहे. वेळीच उपाययोजना केली नाही, तर झाडे मरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे कृषी विभागाने सर्वेक्षण करून यावर उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

> नारळ व सुपारी लागवडीसाठी मॅन्ग्रोरोहयो अंतर्गत फळबाग लागवड योजनेमधून अनुदान उपलब्ध आहे. सुपारी लागवडीसाठी हेक्टरी २, ७२, ४१० रुपये व नारळ लागवडीसाठी हेक्टरी १,६९,५०१ रुपये अनुदान दिले जाते. औषधे व खते पुरवठा मात्र केला जात नाही.
>
> -मनीषा भुजबळ, कृषी अधिकारी, मुरुड तालुका.

> निसर्ग चक्रीवादळात संपूर्ण कोकण किनारपट्टीवरील नारळ सुपारीच्या बागा उद्ध्वस्त झाल्या. शासनाने पंचनामे तत्परतेने केले, परंतु नुकसानभरपाई अतिशय तुटपुंजी दिली. ५० ते ६० वर्षांपूर्वीची चांगली फळे देणाऱ्या बागा उध्वस्त झाल्या. बाधित क्षेत्रात पुनर्लागवडीचे प्रमाण वाढण्यासाठी भरीव शासन अनुदान मिळावे, अशी अपेक्षा असल्याचे एका शेतकऱ्याने सांगितले.

### माड पाडेकऱ्यांच्या वानवा

**२०२० पूर्वी मुरूड तालुक्यातून दर आठवड्याला सुमारे सात ते आठ ट्रक शहाळी मुंबई, वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीला जात असत. ते प्रमाण आता चार ते पाच ट्रकऐवजी टेम्पोवर आले आहे. माड पाडेकऱ्यांची संख्याही दिवसेंदिवस कमी होत आहे. युवा पिढी यात काम करण्याच इच्छुक नाही. त्यामुळे उपलब्ध पाडेकऱ्यांच्या मिन्नतवाऱ्या करून नारळ पाडावे लागतात ही वस्तुस्थिती आहे. पाडेकऱ्यांना विमा संरक्षण नाही. त्यामुळे उंचच उंच ६०-७० फुटांवर चढायला युवापिढी तयार होत नाही. त्यामुळे फळ काढणी मोठी समस्या होऊ पहात आहे. काही बागातदार माड माडीसाठी वार्षिक लिलाव बोलीने देणे पसंत करतात. सरासरी १५०० ते २००० रुपये एका माडासाठी वार्षिक उत्पन्न मिळू शकते, मात्र माडीला माड दिले की, माड लवकर मरतात अशी भीती बुजुर्ग मंडळी घालतात.**

> पांढरी माशी वा अन्य किटाणू नियंत्रण करण्यासाठी इमिडाक्लोप्रिड १७. ८ एस. एल ०. ००५ टक्के तीन मिली प्रति १० लिटर पाण्यातून किंवा ०.५ टक्के निमतेल वापरून फवारणी करावी.
>
> -जीवन आरेकर, शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद, रोहा

औषध फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या टू स्ट्रोक पॉवर स्प्रेची किंमत बाजारात ५० हजारांहून अधिक असल्याने गरीब बागायतदारांना पंप खरेदी करणे आवाक्याच्या बाहेरचे आहे, शिवाय अशा पंपाने फवारणी २५ ते ३० फुटांपर्यंतच शक्य होते. येथील माडाची झाडे जुन्या वाणांची असल्याने ती उंच वाढणारी असून, ती ८० ते ९० फुटांपर्यंत आहे. त्यामुळे फवारणी करणे शक्य होत नसल्याचे सांगण्यात येत आहे. माडांच्या झाडांवर चढून नारळ पाडणाऱ्या पाडेकऱ्यांचीच येथे वानवा असल्याने औषध फवारणी करणे मुश्कील झाले आहे. अशा विविध समस्यांनी येथील शेतकरीवर्ग त्रस्त झाला आहे.

# गर्भवती महिलेचा मोफत सोनोग्राफीला वाराचा खोडा

| नवीन पनवेल | वार्ताहर |

गर्भवती महिलेची प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून एक मोफत सोनोग्राफी केली जाते. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन त्या ठिकाणाहून सोनोग्राफी सेंटरमध्ये पाठवले जाते. मात्र या सोनोग्राफी सेंटरमध्ये मंगळवारी आणि शुक्रवारी सोनोग्राफी करण्यासाठी बोलावले जाते.

पनवेल तालुक्यात आजीवली, आपटा, गव्हाण, नेरे, वावंजे ही प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. यापैकी चार प्राथमिक आरोग्य केंद्राचे सोनोग्राफी सेंटर सोबत इमओयु करण्यात आलेले आहेत. तर आपटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मिळणाऱ्या गर्भवती महिलांना खारघर आणि अलिबाग येथे सोनोग्राफी साठी पाठवण्यात येते. नेरे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या गर्भवती महिलांना पनवेल येथील एका डायग्नोस्टिक सेंटरमध्ये पाठवण्यात येते. मात्र त्या ठिकाणाहून बऱ्याच महिलांना मंगळवारी किंवा शुक्रवारी येण्यास सांगितले जाते. त्यामुळे गर्भवती महिलांना पुन्हा घरी परत यावे लागते. तसेच येण्याजाण्याचा खर्च देखील वाया जातो. कोणत्याही दिवशी डायग्नोस्टिक सेंटरमध्ये गेल्यानंतर गर्भवती महिलांची मोफत सोनोग्राफी करून देणे क्रम प्राप्त आहे. मात्र याला हरताळ फासले जात आहे.


ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## गाडी बाजूला घेण्यास सांगितल्याने मारहाण

**नवीन पनवेल :** सोसायटीच्या येण्या जाण्याच्या रस्त्यामध्ये लावलेली गाडी बाजूला घेण्यास सांगितले असता त्याचा राग आल्याने शिवीगाळ आणि दांडक्याने मारहाण केल्याची घटना पनवेल येथे घडली. मारहाण केल्याप्रकरणी आरोपी प्रद्युम रमेश रावत (राहणार साईनगर, पनवेल) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मारुती चव्हाण हे साईनगर,पनवेल येथे राहत असून ७ जानेवारी रोजी ते कामावर जाण्यासाठी सोसायटीच्या पार्किंग मध्ये कार घेण्यासाठी आले. यावेळी पार्किंगमध्ये जाण्याच्या मार्गावर एक स्कॉर्पिओ गाडी आडवी लावलेली होती. त्या इसमाला गाडी बाजूला घे असे बोलले असता त्याला राग आल्याने त्याने वाद घातला आणि गाडी बाहेर येऊन दांडक्याने चव्हाण यांच्या डोक्यावर मारहाण केली. यात चव्हाण जखमी झाले. या प्रकरणी प्रद्युम रमेश रावत याच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

# विद्यार्थ्यांना करिअरचे धडे



| तळा | वार्ताहर |

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा येथे नुकतेच व्यक्तिमत्त्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तळा तालुक्यातील गिरणे गावचे सुपुत्र भारतीय लष्करातील जवान गणेश कीर्तने व तळा येथील पोलीस दलात कार्यरत असलेले माजी विद्यार्थी साईराज लिमकर यांनी विद्यार्थ्यांना करिअरचे धडे देत मार्गदर्शन केले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे, शाळा समितीचे चेअरमन महेंद्र कजबजे, शिक्षक प्रतिनिधी प्रा. द्यानेकर, प्रा. पाटील, प्रा. भुरे, प्रा. कुळकर्णी, पत्रकार डी.टी.आंबेगावे आदी मान्यवर उपस्थित होते.

तळा तालुक्यातील गिरणा या गावातील कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी गणेश प्रकाश कीर्तने गरीब परिस्थितीवर मात करून भारतीय लष्करी सेवेमध्ये देशसेवा करीत आहेत तर संघर्षावर मात करीत पोलीस दलात कार्यरत असलेले तळा येथील साईराज लिमकर यांनी आपले करिअर कसे घडवले? त्यांच्या अनुभवाचा विद्यार्थ्यांना फायदा व्हावा या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला भारतीय जवान गणेश कीर्तने व पोलीस साईराज लिमकर यांना विद्यार्थ्यांनी उभे राहून सलामी दिली. यावेळी भारतीय जवान गणेश कीर्तने यांनी त्यांचा सुरुवातीपासूनचा संघर्षमय जीवनप्रवास विद्यार्थ्यांना सांगितला. आपण नेहमी मोठे स्वप्न पहा, मी याच जूनियर कॉलेजचा विद्यार्थी असून एकेकाळी तुमच्यासारखाच खाली बसून भारतीय लष्करी सेवेत देशसेवा करण्याचे स्वप्न पाहत होतो, मेहनत घेतली, खूप अभ्यास केला, परिस्थितीचा बाऊ केला नाही, त्याचे फळ आज मिळाल्याचे सांगितले.

## चार्जिंग बॅटऱ्यांची चोरी

| पनवेल | वार्ताहर |

कंपनीत उभ्या असलेल्या वाहनाच्या दोन चार्जिंग बॅटऱ्या चोरून नेल्याप्रकरणी दोन अनोळखी इसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बिजी शिर्के प्रा लि. फेज २ तळोजा सेकटर ३३, फ्रिकासीटिंग यार्ड समोरील रोड जवळ कंपनीमधील उभ्या असलेल्या वाहनाच्या ५८ हजारांच्या २ बॅटऱ्या अनोळखी ईसमानी टिव्हीएस मोटारसायकल वरून घेऊन ते पळून गेले.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## विद्या विकास मंदिर शाळेतील बच्चे कंपनी नृत्यावर थिरकले



| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ गावातील विद्या विकास मंदिर शाळेतील इंग्रजी माध्यम आणि बालवाडी विभागातील विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात विविध प्रकारच्या नृत्यावर धमाल केली.बालवाडी आणि इंग्रजी माध्यम विभागातील बच्चे कंपनीने तब्बल चार तास सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून धमाल उडवून दिली.

विद्या विकास मंदिर शाळेच्या मराठी बालवाडी विभाग आणि इंग्रजी माध्यम विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. या स्नेहसंमेलनास विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष बल्लाळ जोशी, संस्थेचे कार्याध्यक्ष प्रसन्न खेडकर, संस्थेचे कार्यवाह अमित जोगळेकर तसेच शिक्षक- पालक संघ उपाध्यक्ष पडवळ तसेच हजारे उपस्थित होते. वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सुजाता कांबळे यांनी केले. सुरुवातीला मराठी भाषेतून प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापिका स्वाती तुपगांवकर यांनी तर इंग्रजी भाषेत प्रास्ताविक मुख्याध्यापिका स्नेहा म्हसे यांनी केले.या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी किर्तन, गोष्टी, देशभक्ती पर गीते सादर करून आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले.त्यात साऊंड अँड साऊंड विगो, शिवाजी महाराज जन्म सोहळा, अफजल खान हल्ला, वासुदेव आला, चिमणा चिमणा, उड्डाण, धडक धडक, लाठी काठी, सणांचे गाणे, स्कूल चले, कीर्तन, भारुड, आजीबाईची गोष्ट, आईचा गोंधळ, बाईपण देगा देवा, तारे जमी पे तसेच देश भक्तीपर गाणी यावेळी बच्चे कंपनीने सादर केली.

## मुरुड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सिराज शेख यांची निवड

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरुड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्ष पदी सिराज शेख यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. मुरुड तालुका पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी निवड संदर्भातील सभा नुकतीच भंडारी बोर्डिंगच्या प्रशस्त सभागृहात संपन्न झाली. मावळते अध्यक्ष अमोलकुमार जैन यांच्या अध्यक्षतेखाली सदरची सभा संपन्न झाली. यावेळी नवीन कार्यकारिणीमध्ये नवीन पदाधिकारी यांची निवड सुद्धा करण्यात आली आहे. यामध्ये मुरुड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सिराज शेख हे मिड डे, इंकीलाब, महानगरी टाइम्स आणि रायगड न्यूजमध्ये वार्ताहर म्हणून काम करीत आहे. तर उपाध्यक्षपदी सुधीर नाझरे, सचिवपदी नितीन शेडगे, सहसचिवपदी गणेश चोडणेकर, खजिनदारपदी उदय खोत तर ज्येष्ठ सल्लागारपदी मेघराज जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या वेळी नवनिर्वाचित अध्यक्ष सिराज शेख यांनी सर्व सभासदांचे आभार मानून सर्व सदस्यांना सोबत घेऊन पत्रकार संघाच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

## साई पालखीचे चोंढी येथे स्वागत

**सोगाव :** प्रखर साईभक्त असलेले किहीम सरपंच पिंट्या गायकवाड यांनी सालाबादप्रमाणे आपल्या कुटुंबातील सदस्य व मित्रपरिवारांसह श्री. साईधाम मंदिर, रांजणपाडा तर्फे आयोजित श्री. साईबाबा पालखी प्रस्थान सोहळ्याचे चोंढी येथे भव्य स्वागत करीत दर्शन घेतले. यावेळी चोंढी येथे पालखीचे दर्शन घेण्यासाठी सरपंच पिंट्या गायकवाड यांच्यासह ज्येष्ठ समाजसेवक सुधीर उर्फ बाळू गायकवाड, सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना पाटील तसेच सुदेश सावंत, विनोद भोईर, विजय भोईर, अंकुश साळुंखे, आप्पा साळुंखे, निवेदिता भोईर, पंकज भोईर, सागर भोळे, सोनाली भोईर, पिंट्या गायकवाड मित्रमंडळाचे सदस्य व चोंढी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र अर्ज ८९/२०२४

**जाहिर नोटीस**

श्रीम. सुषमा गोपीनाथ पाटील
रा. शहाबाज, पो. पोयनाड — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत कुसुंबळे,
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार श्रीम. सुषमा गोपीनाथ पाटील यांचे वडील कै. गोसावी हिरु वावेकर यांचा मृत्यु दि. २३/७/१९८२ रोजी राहत्या घरी मौजे - काचळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथे झाला आहे.

२. मृत्युची नोंद ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय कुसुंबळे यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत कुसुंबळे येथे केलेली नसल्याने त्यांना मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यु तारखेच्या नोंदीचे आदेश, जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत कुसुंबळे यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेश आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापुसान दि.२७/०१/२०२५ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. १०/१२/२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

ठिकाण : अलिबाग
तारिख : १०/१२/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

**जाहिर नोटीस २०२४-२५**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, महामंडळ आद्योगिक विकास महामंडळाचे महाड आद्योगिक क्षेत्रातील नांगलवाडी फाटा ते जलशुध्दीकरण केंद्र या मुख्य रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याच्या मध्ये झाडे येत असल्याने सदर वृक्ष तोडण्यासाठी वृक्ष अधिकारी म्हणून उपअभियंता मऔविम, उपविभाग महाड यांनी माझ्याकडे परवानगी मागितली आहे. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| तपशिल | एकूण वृक्षसंख्या व वृक्षांचे प्रकार | वृक्ष तोडण्याचे कारण | शेरा |
|---|---|---|---|
| नांगलवाडी फाटा जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत ४ पदरी सिमेंट काँक्रिट रस्त्याचे बांधकाम करणे. | आकेशिया २८, उंबर ०६, करंज ०२, गुलमोहर ०१,निव १५, बहावा ०२, भैड ०३, रेन्ट्री १६, विलायची चिंच १०, सावर ०५, देशी बदाम ०३, **एकूण वृक्षसंख्या =९१** | सिमेंट काँक्रिट रस्ता रूंदीकरणात येत असल्यामुळे. | सिमेंट काँक्रिट रस्ता रूंदीकरणात येत असल्यामुळे. |

तरी कलम ११ (२)Maharashtra (Urban Areas) Protection & Preservation of Trees Act १९९५ कलम ८ नुसार सदर तोडण्यासंदर्भात अथवा फांदया छाटण्याबाबत कुणाच्याही कुठल्याही प्रकारच्या हरकती असल्यास त्यांनी आम्हांस ही नोटीस पोहचले पासून ८ दिवसांच्या आत खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. तसे काणी न कळविल्यास मागणी प्रमाणे झाडे तोडण्याबाबत अथवा फांदया छाटण्याबाबत परवानगी दिली जाईल. नंतर कोणाची, कसलीही तक्रार चालणार नाही, म्हणून जाहीर नोटीस दिली.

महाड.
दिनांक- १३/०१/२०२५.

सही /-
**वृक्ष अधिकारी**
**विशेष नियोजन प्राधिकरण**
**व कार्यकारी अभियंता,**
**औविम (स्था.) विभाग, महाड.**
**महाड-४०२३०९**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. धोंडीबा वाघोबा कोलपे यांचे कडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं / भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बहिरोळे ता.अलिबाग | १७४ | जिरायत ०-३३-८०<br>वरकस ०-०२-३०<br>०-३६-१०<br>पो.ख. ०-०४-७०<br>एकुण ०-४०-८० | ७.३१ |

वडिल मिळकतीतील एकुण क्षेत्र - ०-४०-८० पैकी दक्षिणेकडील भाग ०-२४-८० हे.आर.चौ.मी. एवढे क्षेत्र खरेदी करत आहेत.

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेखत, गहाण, दान, बोजा, लिज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशिर हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलोच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध दिनांकापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे कळवावे. वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरची मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि. १३/०१/२०२५

**ॲड. राकेश अशोक पाटील**
मो - ९०२८४२४३९३
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड.

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, अलिबाग

**चेंढरे, रिलायन्स पेट्रोल पंप समोर, तालुका अलिबाग-४०२२०१**
**दुरध्वनी क्र. ०२१४१-२२३३७२-२४**

**जाहीर सूचना**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, अलिबाग'' यांच्या लिपिक (क्लार्क) हुद्द्याच्या रिक्त पदांसाठी ऑनलाईन परिक्षा घेण्यात येणार आहे. ही ऑनलाईन परीक्षा १८ आणि १९ जानेवारी २०२५ रोजी आयोजित केली जाईल. या परिक्षेसाठी अर्ज करणारे उमेदवार ज्यांनी परिक्षा शुल्क भरले आहे, त्यांना बँकेच्या संकेतस्थळावरून (https://www.rdccbank.com किंवा https://raigaddccbrecruitment.com ) १३ जानेवारी २०२५ पासून १७ जानेवारी २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत आपले हॉल तिकिट डाउनलोड करणे आवश्यक आहे. उमेदवारांना हॉल तिकिट डाउनलोड SMS करण्यासाठी द्वारे देखील लिंक प्राप्त होईल. परीक्षेपूर्वी १५ आणि १६ जानेवारी रोजी बँकेच्या संकेतस्थळावर प्रात्यक्षिक परीक्षा (Trial Exam) आयोजित केली जाईल. अधिक माहितीसाठी किंवा शंका असल्यास, कृपया ९२२५१७६१०० वर संपर्क साधा किंवा recruitment2024@rdccbank.in. वर ईमेल पाठवा.

हॉल तिकिटावर दिलेल्या सूचनांचे पालन करून उमेदवारांनी योग्य वेळी परीक्षा केंद्रावर हजर राहावे.

स्थळ : अलिबाग
दिनांक: १३ जानेवारी २०२५

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

दिनांक : १३ जानेवारी २०२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे पुलाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर-चौ-मी | आकार रु. - पै. |
|---|---|---|---|---|
| विरल अशोक शहा | ३२ | २/अ१६ | ४०००.०० | ४००-०० |

जुना सर्व्हे नंबर मौजे वंजारवाडी ५१/२अ१६

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-१३/०१/२०२५

दिनांक : १३ जानेवारी २०२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|---|
| प्रदिपकुमार दत्तात्रय अदाटे | ९ | ३ ब | १-१०-० | ०-९१ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १३/०१/२०२५

# अलिबाग चॅम्पियन्स ट्रॉफीची जल्लोषात सांगता











(छायाचित्र : समीर मालोदे)









## निवडक



### श्रीलंकेने उडवला न्यूझीलंडचा धुव्वा

**सिडनी** : न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्यातील ३ एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना ईडन पार्कवर खेळला गेला. पाहुण्या संघाने हा सामना १४० धावांनी जिंकला. या सामन्यात श्रीलंकेने न्यूझीलंडला २९१ धावाचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात यजमान संघ १५० धावातच गारद झाला. मात्र, न्यूझीलंडने याआधीच सलग पहिले दोन एकदिवसीय सामने जिंकून मालिका जिंकली होती. पण तिसऱ्या वनडेत श्रीलंकेने यजमानांचा धुव्वा उडवत मालिकेचा शेवट गोड केला.तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडची फलंदाजी अत्यंत खराब झाली होती. हा सामना जिंकण्यासाठी यजमानांनी २९१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. याचा पाठलाग करताना किवी संघ २९.४ षटकांत १५० धावांवर गारद झाला. या सामन्यात न्यूझीलंडच्या सहा फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. ज्यामध्ये विल यंग (०), रचिन रवींद्र (१), डॅरील मिशेल (२), टॉम लॅथम (०), ग्लेन फिलिप्स (०) आणि मिचेल सँटनर (२) यांचा समावेश होता. श्रीलंकेसाठी असिता फर्नांडो, महेश तिक्षना आणि इशान मलिंगा यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या.



### चिराग-सात्विकचे आव्हान संपुष्टात

**बडोदा** : : मलेशिया सुपर बॅडमिंटन स्पर्धेतील भारताच्या सात्विक आणि चिराग शेट्टी यांची शानदार वाटचाल अखेर उपांत्य फेरीत संपुष्टात आली. कोरियाच्या किम वोन हो आण सेऊ सेउंग जे यांच्याविरुद्ध त्यांना सरळ गेममध्ये पराभव सहन करावा लागला.या स्पर्धेत सातवे मानांकन असलेल्या सात्विक आणि चिराग यांनी गतवर्षी अंतिम फेरीत स्थान मिळवले होते. आज उपांत्य सामन्यात मात्र त्यांचा ४० मिनिटांत १०-२१, १५-२१ असा पराभव झाला. आशिया स्पर्धेत ब्राँझपदकाची कमाई करणाऱ्या सात्विक आणि चिराग यांची सुरुवातच निराशाजनक होती. पहिल्या गेममध्ये पहिल्या ब्रेकपर्यंत ते ६-११ असे पिछाडीवर पडले होते. त्यानंतर प्रयत्न करूनही ते कोरियन खेळाडूंशी बरोबरी करू शकले नाहीत. परिणामी, हा पहिला गेम त्यांनी अवघ्या १९ मिनिटांत गमावला. दुसऱ्या गेममध्ये चुकांमध्ये सुधारणा करीत पहिल्या ब्रेकमध्ये ११-८ अशी आघाडी घेतली; परंतु ही लय ते पुढे कायम ठेवू शकले नाहीत. उलट कोरियन खेळाडूंना त्यांनी पुनरागमनासाठी रस्ता मोकळा करून दिला. चिराग आणि सात्विक आता इंडियन ओपन स्पर्धेत आपले नशीब अजमावणार आहेत. ही स्पर्धा १४ जानेवारीपासून सुरू होत आहे.



### सुधागड तालुक्यात कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव

**पाली/गोमाशी** : पंचायत समिती सुधागड पाली यांच्या वतीने कला क्रीडा व सांस्कतिक महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेदरम्यान१०० मीटर, २०० मीटर धावणे, कॅरम, बुद्धिबळ, क्रिकेट, बॅडमिंटन, लगोरी अशा विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. दैनंदिन जीवनातील रोजची कामे, कौटुंबिक सामाजिक ताणतणाव, कार्यालयीन ऑनलाईन व ऑफलाईन कामा व्यतिरिक्त क्रीडा महोत्सवात तालुक्यातील सर्व विभागातील शासकीय कर्मचारी आपल्या वयाचे भान विसरून या स्पर्धेत खेळत होते. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे धावण्याच्या स्पर्धेत सेवानिवृत्तीवर असणारे कर्मचारी, महिला कर्मचारी, गटविकास अधिकारी लता मोहिते, गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, विस्तार अधिकारी अहिरराव यांनी सुद्धा सहभाग घेतला होता. २०० मीटर धावणे महिला गट आशाताई इप्पर बहिरमपाडा शाळा तर १०० मीटर धावणे पुरुष गुरुनाथ शेरमकर, संजय थळे, जनार्दन भिलारे तसेच २०० मीटर धावणे पुरुष साजेकर, गदमले, राठोड यांनी क्रमांक पटकावले. या स्पर्धेतील क्रिकेटचा अंतिम सामना फायटर राणे विरुद्ध पाली बीट रोशन तांडेल यांच्यामध्ये झाला.यामध्ये फायटर राणे यांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या स्पर्धेचे धावते समालोचन नाईक, जनार्दन भिलारे यांनी केले.

### तमिम इक्बालची पुन्हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

**राजकोट** : बांगलादेशचा माजी कर्णधार तमीम इक्बालने पुन्हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याच्या कारकिर्दीला त्याने दुसऱ्यांदा निरोप दिला आहे. तमिमने जुलै २०२३ मध्येही आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती, पण २४ तासांच्या आत त्याने निर्णय बदलला. तमिमने नुकतीच राष्ट्रीय निवड समितीची भेट घेतली. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी संघ जाहीर होण्यापूर्वीच त्याने निवृत्ती घेतली.तमिमने सप्टेंबर २०२३ मध्ये बांगलादेशकडून शेवटचा सामना खेळला होता. फेब्रुवारी २००७ मध्ये झिम्बाब्वेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यातून त्याने आंतरराष्ट्रीय कारकिर्दीची सुरुवात केली. तमिमने ७० कसोटी सामन्यांमध्ये ३८.८९ च्या सरासरीने ५१३४ धावा केल्या आहेत. यामध्ये १० शतके आणि ३१ अर्धशतकांचा समावेश आहे. त्याच्या नावावर २४३ एकदिवसीय सामन्यांमध्ये ८३५७ धावा आहेत.

## चिरनेर गावात केटीएम प्रीमियर लीगचा शुभारंभ

**उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांच्या हस्ते उद्घाटन**



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील चिरनेर या ऐतिहासिक गावात मधीलपाडा, तेलीपाडा, कुंभारपाडा ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या केटीएम प्रीमियर लीग २०२५ चा शुभारंभ उद्योगपती राजेंद्र खारपाटील, उद्योगपती सागर खारपाटील, सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच सचिन घबाडी, चिरनेर तंटामुक्तीचे अलंकार परदेशी, शेकापचे सुरेश पाटील, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, माजी सरपंच पद्माकर फोफेरकर, शेकापचे प्रशांत खारपाटील, निकिता नारंगीकर, नीलम चौलकर, अर्जुन मोकल, स्वप्निल पाटील, समीर डुंगीकर, नितीन म्हात्रे, राजेंद्र भगत,नरेश नारंगीकर, जयेश खारपाटील, अनंत नारंगीकर, नितीन नारंगीकर तसेच अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

केटीएम प्रीमियर लीगच्या निमित्ताने श्रीराम मंदिर चिरनेर येथे सायंकाळी सहा वाजता चषक अनावरण व चषक मिरवणूक सोहळा संपन्न झाला. या रॅलीत नामांकित खेळाडू, त्यांचे संघमालक, व्यवस्थापक, हितचिंतक, निवेदक, समालोचक व ग्रामस्थ सहभागी झाले होते. दरम्यान मधीलपाडा, तेलीपाडा, कुंभारपाडा ग्रामस्थ प्रीमियर लीगच्या निमित्ताने विशेष परिश्रम घेत आहेत.

मिक्स बॉक्सिंग राष्ट्रीय स्पर्धा

## द्रुती लाडला सुवर्णपदक

**म्हसळा** : उसर गावची कन्या द्रुती जयराम लाड हिला देशाची राजधानी दिल्ली येथे ५वी मिक्स बॉक्सिंग राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त झाले. उत्कृष्ट फायटर म्हणून सन्मानित करण्यात आले. तसेच नेपाळ येथे होणाऱ्या एशियन मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत निवड झाली. ती कराटेमध्ये फस्ट डन ब्लॅक बेल्ट आहे. द्रुती लाड ही २०१० पासुन कराटे, मिक्स बॉक्सिंग शिकत आहे. तिने राष्ट्रीय स्तरावर ५ सुवर्णपदके प्राप्त केली आहेत. तिने वर्ल्ड मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशीपमध्ये भारत देशाला सुवर्ण पदक प्राप्त करुन दिले आहे.ती आता एमपीएसएस स्कूलमध्ये शिक्षक आहे. डॉ.सी.डी.देशमुख वरिष्ठ महाविद्यालयामध्ये शिकत आहे.

राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धा

## सिद्धांत रायफल अँड पिस्टल शूटिंग क्लबचे सुयश

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

दिल्ली येथे झालेल्या ६७ व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत सिद्धांत रायफल क्लब मार्फत महाराष्ट्र रायफल संघटनेने प्रतिनिधित्व केले होते. यात गौरव जगदीश ठाकूर याने दहा मीटर एअर पिस्टलमध्ये सुयश प्राप्त करून, नॅशनल रीनाउंड शॉट ही पदवी संपादन केली आहे. तर वेदांत खारके, सुप्रीता सुबुद्धी, जयंता साळवे हे विद्यार्थीदेखील नॅशनल रीनाउंड शॉर्ट पदवीस पात्र ठरले आहेत.




सिद्धांत रायफल क्लबचे प्रीतम पाटील, प्रशिक्षक अलंकार कोळी, प्राचार्य गौरी शहा, कोळी सर, विश्वजीत सर, अंबरनाथ चौधरी, समाधान घोपरकर, अतुल मोकल, सुनील मढवी या सर्वांनी या विद्यार्थ्यांना सरावासाठी योग्य ते सहकार्य व मार्गदर्शन करून, सराव करून घेतला होता. त्यामुळे हे नेत्रदीपक यश प्राप्त झाले आहे. दरम्यान या नेमबाजी स्पर्धेतील विजेत्यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

जोकोविचला विक्रमाची संधी | ऑस्ट्रेलियन खुली टेनिस स्पर्धा आजपासून

## कार्लोस अल्कराझ, यानिक सिन्नेर मुख्य आकर्षण

**। मेलबर्न । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेच्या नव्या हंगामाला सुरुवात होईल तेव्हा नोव्हाक जोकोविचच्या विक्रमी कामगिरीचे आकर्षण राहणार असले, तरी खरी स्पर्धा कार्लोस अल्कराझ आणि यानिक सिन्नेर यांच्यातच रंगेल असा अंदाज वर्तवला जात आहे.




अल्कराझनेदेखील सिन्नेरचे आव्हान मान्य केले आहे. जेव्हा जेव्हा मी सिन्नेरला अव्वल स्थानावर बघतो, तेव्हा मला आणखी कठोर सराव करण्याची जाणीव होते. त्यामुळेच सराव करताना सिन्नेरविरुद्ध खेळण्यासाठी कशा सुधारणा कराव्या लागतील याचाच विचार सुरू असतो, असे अल्कराझ म्हणाला.कठोर सराव करायला भाग पडणे ही भावनाच मला मोठी आणि महत्त्वाची वाटते. टेनिसपटूंमध्ये इतकी मोठी स्पर्धा असणे आणि त्यासाठी सर्वोत्तम खेळ करण्यासाठी विचार करावा लागणे यामुळे मेहनतीपासूनच कस लागतो, असेही अल्कराझने सांगितले.

अल्कराझ आणि सिन्नेर ही नावे सध्या टेनिसविश्वात आघाडीवर आहेत. रॉजर फेडरर पाठोपाठ राफेल नदालने माघार घेतल्यामुळे आता टेनिसविश्वात इतिहास घडविणाऱ्या तीन सर्वोत्तम टेनिसपटूंपैकी नोव्हाक जोकोविचचेच आव्हान या दोघांसमोर असेल. यातही जोकोविचचा सिन्नेरच्या गटात समावेश असल्यामुळे प्रवास अखंडित राहिल्यास दोघांची उपांत्य फेरीत गाठ पडू शकते.

टेनिस विश्वावर नजर टाकल्यास केवळ नावेच बदलली आहेत. खेळातील गतिमानता आणि चुरस तेवढीच तीव्र राहिली असल्याचेच दिसून येते. सिन्नेर आणि अल्कराझ यांचे महत्त्व सांगताना ॲलेक्झांडर झ्वेरेव म्हणाला, दोघेही सर्वोत्तम खेळाडू आहेत. तुम्हाला जिंकायचे असेल, तर यांना पराभूत करावे लागेल. झ्वेरेवला स्पर्धेत दुसरे मानांकन आहे. सिन्नेरला पहिले, तर अल्कराझला तिसरे मानांकन मिळाले आहे. सिन्नेर गतविजेता आहे, तर अल्कराझने विम्बल्डन स्पर्धेचे जेतेपद मिळवले आहे. याखेरीज दोघांनी गेल्या वर्षी अनुक्रमे अमेरिकन आणि फ्रेंच खुली स्पर्धाही जिंकली आहे. अल्कराझने या दोन्ही विजेतेपदाच्या प्रवासात झ्वेरेववर मात केली आहे.

महिला विभागात अग्रमानांकित अरिना सबालेन्का, ऑलिम्पिक विजेती झेंग किन्वेन यांच्या पहिल्या दिवशी, तर इगा श्वीऑटेक, कोको गॉफ दुसऱ्या दिवशी कोर्टवर उतरतील.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)